आसाम विधानसभा निवडणुकांपूर्वी खेरा यांनी पत्रकार परिषदेत रिनिकी भुयान सरमा यांच्याकडे तीन देशांचे परदेशी पासपोर्ट असल्याचा दावा करत त्यांच्या आर्थिक हितसंबंधांबाबत वादग्रस्त विधान केले होते. त्यानंतर सरमा यांनी त्यांच्या विरोधात पोलिसांत तक्रार केली होती. या प्रकरणी तेलंगणा उच्च न्यायालयाने खेरा यांना सात दिवसांचा ट्रान्झिट अटकपूर्व जामीन मंजूर केला होता, परंतु आता न्यायालयाने त्या आदेशाला स्थगिती दिली. त्यानंतर खेरा यांनी जामिनासाठी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. परंतु सर्वोच्च न्यायालयाने त्यांना गुवाहाटी उच्च न्यायालयात जाण्यास सांगितले होते.

## नंदूरबारमध्ये बर्ड फ्लूचा उद्रेक दीड लाख कोंबड्या मारणार


■ नंदूरबार

**नंदूरबार** जिल्ह्यातील नवापूर तालुक्यात बर्ड फ्लूचा शिरकाव झाल्याने मोठी खळबळ उडाली. मागील काही दिवसांत अचानक मृत पावलेल्या कोंबड्यांच्या मृत्यूमागे बर्ड फ्लू असल्याचे पशुसंवर्धन विभागाने पाठवलेल्या नमुन्यांच्या अहवालातून स्पष्ट झाल्याने प्रशासनाने हालचाली सुरू केल्या आहेत.

नवापूर तालुक्यातील पोल्ट्री केंद्रात १३ ते १४ एप्रिल रोजी सुमारास दीडशे ते दोनशे कोंबड्या अचानक मृतावस्थेत आढळल्या होत्या. यानंतर प्रशासनाने मृत कोंबड्यांचे नमुने भोपाळ येथील प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवले.

## २०२६-२७ मध्ये मार्केट क्रॅश? कियोसाकींचा मोठा इशारा

**जगप्रसिद्ध अर्थविषयक पुस्तक रिच डॅड पुअर डॅडचे लेखक रॉबर्ट कियोसाकी यांनी पुन्हा एकदा जागतिक अर्थव्यवस्थेबाबत गंभीर इशारा दिला आहे. २०२६-२७ दरम्यान जागतिक बाजारपेठेत मोठी घसरण होण्याची शक्यता व्यक्त करत त्यांनी संभाव्य मार्केट क्रॅशबाबत सावधगिरीचा इशारा दिला आहे.**



■ न्यूयॉर्क

**कियोसाकी** यांनी एक्सवर पोस्ट करत म्हटले आहे की, येऊ घातलेली ही आर्थिक पडझड ऐतिहासिक ठरू शकते आणि ती महामंदीसारख्या गंभीर संकटाची पुनरावृत्ती ठरू शकते. मात्र, अशा परिस्थितीत गुंतवणुकदारांनी घाबरून न जाता संधी म्हणून पाहावे, असा सल्लाही त्यांनी दिला आहे.

स्वतःचा अनुभव सांगताना कियोसाकी म्हणाले की, जगात जेव्हा जेव्हा आर्थिक मंदी किंवा घसरण झाली, तेव्हा मी अधिक श्रीमंत झालो. वाढते जागतिक कर्ज, पैशाच्या पुरवठ्यातील वाढ आणि शेअर बाजारातील अनिश्चितता हे संभाव्य संकटामागील प्रमुख घटक असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यांच्या मते, या सर्व घटकांचा एकत्रित परिणाम म्हणून शेअर बाजार, रिअल इस्टेट आणि इतर मालमत्ता वर्गांमध्ये तीव्र घसरण होऊ शकते.

## ५ कोटींच्या फसवणूक प्रकरणी खरातला ४ दिवसांची कोठडी

■ नाशिक


**नाशिकमध्ये** भोंदूगिरीच्या माध्यमातून कोट्यवधींची फसवणूक केल्याच्या आरोपाखाली अटकेत असलेल्या भोंदू अशोक खरात याला नवव्या गुन्ह्याच्या संदर्भात नाशिक सत्र न्यायालयात हजर केले होते. पाच कोटी रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी न्यायालयाने त्याला चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. विशेष तपास पथकाने ताब्यात घेतल्यानंतर खरातला व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे न्यायालयात सादर करण्यात आले. फिर्यादी राजेंद्र जासूद यांच्या वकिलांनी सुनावणीदरम्यान गंभीर आरोप करताना सांगितले की, आरोपीने पूजा न केल्यास मृत्यू अटळ असल्याची भीती दाखवून मोठी रक्कम उकळली. तसेच, पूजा करताना नकली साप दाखवून घाबरवले.

उवा लिखां डोक्यातील कोंडा पळतील झटपट
रेपल लाइसनिट
Rs. 60/-




लावा फटाफट
१००% आयुर्वेदिक तेल
विषारी रसायन विरहित
लहान मुलांसाठी १००% सुरक्षित
Only Whatsapp : 8369087234
SS:Mumbai-STL Pharma
Pune : Bhagwati Medicals & Inorbit.
बर्फिला COOL घमौरी पाऊडर
बजर-रंगी लेप
रेपल अडुलसा

माझगाव डॉक शिपबिल्डर्स लिमिटेड
(राष्ट्रासाठी जहाजे व पाणबुड्यांचे निर्माते)
(भारत सरकारचे उपक्रम, संरक्षण मंत्रालय)
सीआयएन: L35100MH1934GOI002079
नोंदणीकृत व कॉर्पोरेट कार्यालय: डॉकयार्ड रोड, माझगाव, मुंबई - ४०००१०
दूर.: ०२२-२३७६२०१५, वेबसाईट: https://mazagondock.in



३१ मार्च २०२६ रोजी संपलेल्या तिमाही आणि वर्षाकरिताचे लेखापरीक्षित एकमेव व एकत्रित वित्तीय निष्कर्षांचा अहवाल

सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स ॲण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) विनियम, २०१५ (सेबी (एलओडीआर) विनियम, २०१५) मधील नियम ३३ च्या अनुषंगाने, माझगाव डॉक शिपबिल्डर्स लिमिटेड (कंपनी) च्या संचालक मंडळाने गुरुवार, ३० एप्रिल २०२६ रोजी झालेल्या सभेत ३१ मार्च २०२६ रोजी संपलेल्या तिमाही व वर्षाकरिता कंपनीचे लेखापरीक्षित वित्तीय निष्कर्ष (एकमेव व एकत्रित) मंजूर केले आहेत. (निष्कर्ष)

सदर निकालासह, कंपनीचे वैधानिक लेखापरीक्षक असलेल्या मे. सारडा ॲण्ड पारीख एलएलपी (सनदी लेखापाल) यांनी जारी केलेले स्वतंत्र लेखापरीक्षकांचे अहवाल हे कंपनीच्या https://mazagondock.in या वेबसाईटवर, तसेच बीएसई लिमिटेड आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड या स्टॉक एक्सचेंजच्या अनुक्रमे www.bseindia.com आणि www.nseindia.com या वेबसाईटवर उपलब्ध आहेत.

सेबी (एलओडीआर) विनियम, २०१५ च्या विनियम ४७ चे पालन करत, आम्ही याद्वारे सूचित करतो की, खालील **क्विक रिस्पॉन्स (क्यूआर) कोड** स्कॅन करून देखील सदर माहिती पाहता येईल.

संचालक मंडळाच्या वतीने व करिता
सही/-
रुचिर अग्रवाल
संचालक (वित्त) आणि सीएफओ
डीआयएन - १०१६६५३३

दिनांक: ३०.०४.२०२६
ठिकाण: मुंबई

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# विकासातली विसंगती आणि मिसिंग लिंक

एकीकडे महाराष्ट्र दिनाचे कार्यक्रम राज्यभर होत असताना दुसरीकडे मुंबई-पुणे वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी मिसिंग लिंक या नव्या मार्गाचेही उद्घाटन झाले. उद्घाटनापूर्वीच मुंबई-पुणे द्रूतमार्गावर झालेली सहा सात तासांची वाहतूक कोंडी म्हणजे लोकांना मिळालेली महाराष्ट्र दिनाची मोठी भेटच म्हणावी लागेल. सलग सुट्ट्या आल्या की हमखासपणे मुंबई-पुणे, मुंबई-गोवा, मुंबई-नाशिक आणि नाशिक-पुणे या मार्गांवर हमखासपणे वाहतूक कोंडी होते. मुंबई-गोवा महामार्गावर तर सुट्ट्या असण्याची गरज भासत नाही त्या मार्गावर केव्हा आणि कशा पद्धतीने वाहतूक कोंडी होईल हे सांगता येत नाही. मुंबई पुण्याच्या प्रवाशांना तर वाहतूक कोंडीची बऱ्यापैकी सवय झाली. ही समस्या कमी करण्यासाठी मिसिंग लिंक म्हणजेच काही अंतरासाठीचा वेगळा पर्यायी मार्ग बांधला गेला आहे. या मार्गावरून फक्त हलक्या वाहनांना परवानगी दिली गेली आहे. अवजड वाहने सध्याच्याच पूर्वद्रूतगती मार्गावरून ये-जा करतील. गेल्या महिनाभरातली वाहतूक कोंडीची ही जवळजवळ चौथी वेळ होती. अनेक वाहन चालकांना सकाळीच या समस्येची जाणीव झाली आणि अक्षरशः हजारो प्रवाशांनी बाहेर काढलेल्या गाड्या परत फिरवल्या, अनेकांना आपले बेत रद्द करावे लागले. महाराष्ट्र दिनाच्यानिमित्ताने राज्याच्या विकासाचे पोवाडे गायले जात असताना प्रत्यक्षामध्ये अनेक महत्त्वाच्या गोष्टींची कशी परवड सुरू आहे. हे यानिमित्ताने स्पष्ट होते. मुंबई-पुणे द्रूतगती मार्गाला मिसिंग लिंक हे नाव का दिले गेले हे एक रहस्यच आहे. कदाचित पूर्वद्रूतगती महामार्ग बांधतानाच या जवळच्या मार्गाचाही विचार होऊ शकला असता. परंतु ती बाब लक्षात आली नाही आणि मुंबई-पुण्याला जोडणारी ही लिंक दूर्लक्षित राहिली तिला प्रत्यक्षात आणताना मिसिंग लिंक हे नाव रूढ होत गेले. परंतु यामधून एक महत्त्वपूर्ण वास्तव समोर येते. प्रश्न केवळ पूर्वद्रूतगती मार्गावरच्या वाहतूक कोंडीचा नाही. तर राज्याच्या अनेक भागामध्ये विकासाचे असंतुलन आहे. त्या मिसिंग लिंकचे काय करणार,असा प्रश्न निर्माण होतो.

**नियोजनातली अंधदृष्टी**

याच विकासाच्या विसंगतीवर आणि असमतोलाविषयी आम्ही १ मे च्या संपादकीयमध्ये या मुद्दांचाच आवर्जुन उहापोह केला आहे. प्रातिनिधीक किंवा उदाहरणादाखल जरी मुंबई-पुणे किंवा मुंबई-गोवा महामार्गाचे जरी उदाहरण घेतले तरीसुद्धा एकूण महानगरांची वाढ तिथल्या लोकसंख्येला येणारी सूज म्हणजेच नागरी सुविधांचा अभाव आणि फुगत जाणारी महानगरे याच विरोधाभासाची ही दोन ढळढळीत उदाहरणे आहेत. मुंबई-पुणे द्रूतगती महामार्ग होऊन आज जवळपास तीस वर्षे उलटली परंतु या मधल्या काळामध्ये या दोन महानगरांची वाढ किती वेगाने होणार आहे. पूर्वद्रूतगती महामार्गावरच्या वाहनांच्या संख्येत किती प्रमाणात भर पडणार आहे. याचा विचारच केला गेला नाही. जर त्याचे योग्यवेळी नियोजन झाले असते तर मुंबई-पुणे दरम्यान आणखी पर्यायी मार्गाचा शोधही घेता आला असता. या उदाहरणावरून मुंबई-पुणे किंवा गोवा महामार्गावर होत असलेली वाहतूक कोंडी नियोजनाचा अभाव आणि दूरदृष्टीच कशी हद्दपार झाली आहे याचेच निदर्शक ठरते. महाराष्ट्र विकासाच्या कितीही गप्पा मारल्या आणि लाखो कोटींच्या गुंतवणुकीचे करार जरी केले तरी यासारख्या पायाभूत सुविधांबाबतचे भुसभुशीत नियोजन कोणताही विकास टिकवू शकत नाही. मुंबईच्या लोकसंख्येचा विचार करून मेट्रो प्रकल्प ज्या वेगाने आणि जिद्दीने पूर्ण केले गेले. ती जिद्द मुंबई पुणे किंवा मुंबई-गोवा महामार्गाबाबत का दाखवली जात नाही, असा प्रश्न निर्माण होतो. मुंबई-गोवाबाबत ठरलेल्या सबबी किंवा कारणांची तबकडी वाजवली जाते. मग आधीच्या कंत्राटदारांनी कामे अर्धवट टाकून काढलेला पळ जमीन संपादनामध्ये आलेल्या अडचणी अशी काही कारणे सांगितली जातात. परंतु ती फारशी पटणारी नाहीत. मुंबई-गोवा महामार्गापाठोपाठ शक्तीपीठ मार्गाचे नियोजन झाले. त्याच्या भूसंपादनासाठी सगळ्या प्रकारच्या राजकीय तडजोडी समझोते केले गेले. शेतकऱ्यांना अधिकाधिक मोबदला देऊन जमिनी संपादित केल्या गेल्या. परंतु गोवा महामार्गाचे दूष्टचक्र अजून संपायला तयार नाही.

**राज्यातील अन्य मार्गांचे काय?**

तीच परिस्थिती नाशिक-पुणे महामार्गाची आणि रेल्वेचीही आहे. तीन तासांत हे अंतर पूर्ण होऊ शकते. पण आज तिथे सहा तास लागतात. चाकण येथे मोठ्या औद्योगिक वसाहती असल्याने अवजड वाहनांची वर्दळ असते आणि तिथे जवळपास चोवीस तास वाहतूक कोंडी होते हा प्रकार गेली पंधरा वर्षे तसाच चालू आहे. दोन महानगरांमधला हा महत्त्वपूर्ण दुवा असतानाही उड्डाणपूल बांधून कोंडी दूर करणे हा त्यावरचा उपाय होता. त्याला आता कुठे मंजुरी मिळाली आहे. म्हणजे तो प्रत्यक्षात यायला आणखी पाच वर्ष लागतील.तोच प्रकार नाशिक-पुणे रेल्वेबाबत झाला आहे. अजूनही भूसंपादनाचा घोळ संपलेला नाही. मुंबई नाशिक महामार्गातला ठाणे, भिवंडी पडघा आणि अनेकवेळेला कसारा ते नाशिक या मार्गावरची वाहतूक कोंडी प्रवाशांची कसोटी पाहाणारी असते. ही काही ठळक उदाहरणे किंवा या मार्गांवरची कोंडी चर्चेमध्ये असते. परंतु विदर्भ, मराठवाडा, खानदेश, कोकण या सर्व भागांमध्ये जिल्हा, तालुके एकमेकांना जोडण्यासाठी उत्तम दर्जाच्या रस्त्यांची आवश्यकता आहे. परंतु विकासाबाबतची ही विसंगती हीच सर्वात मोठी मिसिंग लिंक म्हणावी लागते. जवळपास प्रत्येक मंत्रालयाबाबत किंवा खात्याबाबत नियोजनामधल्या या त्रूटी खूप मोठा विरोधाभास निर्माण करीत असतात. आतासुद्धा ही वाहतूक कोंडी मिसिंग लिंकने काही प्रमाणात कमी होणार आहे, समस्या पूर्णपणे संपुष्टात येणारी नाहीच.

## सुविचार


**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

आनंदापेक्षा मोठा पौष्टिक खुराक दुसरा कोणताही नाही आणि दुसऱ्यांना आनंद देणे यासारखे दुसरे समाधान नाही.

## पंचांग

**शनिवार, २ मे २०२६**
**शक १९४८ पराभवनामसंवत्सर**





**रवी उदय- ०६-१२**
**रवी अस्त- १९-००**

*** वैशाख कृष्ण प्रतिपदा**
*** नक्षत्र विशाखा**

**-: जन्मराशी :-**
००-०१ ते २४-०० तूळ

**नारद जयंती (वीणा दान)**

## पाककृती



### शेवयाचा वडा

★ **साहित्य :** १/४ कप शेवया, १ कप जाडा रवा, १ टीस्पून जिरे, १ टीस्पून मीठ, १ कप दही, ५-६ पाने कढीपत्ता चिरून, बारीक चिरून ३ मिरच्या, १ इंच किसलेले आले, २ चमचे तेल, २ चमचे तेल. (तळण्यासाठी).




★ **कृती:** गॅस चालू करून मध्यम आचेवर एक पॅन ठेवा. आता त्यात १/४ कप शेवया गोल्डन ब्राऊन होईपर्यंत कोरड्या भाजून घ्या. नंतर त्या पूर्णपणे थंड करा आणि मोठ्या वाडग्यात काढून घ्या. १ कप रवा, १ टीस्पून जिरे आणि १ टीस्पून मीठ घाला. सर्वकाही चांगले एकत्र करून चांगले मिसळा. आता त्यात १ कप दही, थोडी कढीपत्ता, ३ मिरच्या, १ इंच आले, २ चमचे धणे आणि चिमूटभर हिंग घाला. सर्व काही पुन्हा चांगले मिसळा. या मिश्रणावर झाकण ठेवून २० मिनिटे बाजूला ठेवा.

२० मिनिटांनतर ते मिश्रण पुन्हा एकदा चांगले ढवळून घ्या. शेवया व रवा चांगला मऊ होतो. आता या मिश्रणाला वड्याच्या आकारात वळून घ्या. जास्त कुरकुरीत वडा तळण्यापूर्वी हा वडा शेवयामध्ये घोळवून मग तळा. आवश्यकतेनुसार तेल टाकून मध्यम आचेवर तळून घ्या. वडा दोन्ही बाजूंनी सोनेरी तपकिरी होईपर्यंत तळा. मग ते एका प्लेटमध्ये काढून घ्या. टोमॅटो सॉस किंवा नारळाच्या चटणीबरोबर शेवयाचा वडा खायला द्या.

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफिस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक 'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)



## क्रीडा

# दिल्लीची राजस्थानवर ७ विकेट राखून मात

## के.एल. राहुलची चमकदार फलंदाजी

**जयपूरच्या सवाई मानसिंग स्टेडियमवर आज झालेल्या आयपीएलच्या ४३ व्या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सने राजस्थान रॉयल्सवर ७ विकेट राखून मात दिली. या चौथ्या विजयासह दिल्लीने गुणतालिकेत ८ गुणांसह सहाव्या स्थानावरुन उडी घेतली. या सामन्यात कर्णधार रियान परागच्या ९० धावांच्या बळावर राजस्थानने दिल्लीला विजयासाठी २२६ धावांचे आव्हान दिले होते. या प्रत्युत्तरात सलामीवीर के.एल. राहुलने ४० चेंडूत ७५ धावा केल्यामुळे दिल्लीने ३ गडी गमावून १९.१ षटकांत विजय मिळवल्याने राजस्थानला चौथ्यांदा पराभूत व्हावे लागले.**

■ जयपूर



**राजस्थानने** नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. राजस्थानचे सलामीवीर यशस्वी जयस्वाल (६) आणि वैभव सूर्यवंशी (४) हे झटपट बाद झाल्यानंतर ध्रुव जुरेल आणि कर्णधार रियान पराग यांनी सुरेख खेळी करून संघाची धावसंख्या ११.३ षटकांत २ बाद ११४ वर पोहोचवली. त्यानंतर अक्षर पटेलच्या गोलंदाजीवर ध्रुव जुरेल मोठा फटका मारण्याच्या नादात सीमारेषेवर झेलबाद झाला. मग परागने रविंद्र जडेजाच्या साथीत संघाची धावसंख्या १६ षटकांत ३ बाद १६७ वर नेली. त्यानंतर जडेजा २० धावा करून परागची साथ सोडून तंबूत परतला. त्यानंतर परागही ५० चेंडूत ९० धावा करून माघारी परतला.

जडेजा आणि परागला मिचेल स्टार्कने बाद केले. डोनोव्हान फरेराने दिल्लीच्या गोलंदाजांना चांगलेच चोपून काढून चौकार आणि षटकार ठोकले. त्यात शुभम दुबे ६ धावांवर बाद झाला. शेवटी फरेरा १४ चेंडूत ४७ धावा आणि जोफ्रा आर्चर १ धावेवर नाबाद राहिल्याने राजस्थानने निर्धारित षटकांत ६ बाद २२६ धावा केल्या.

या धावसंख्येचा पाठलाग करताना दिल्लीचे सलामीवीर पाथुम निस्संका आणि के.एल. राहुल यांनी धडाकेबाज सुरुवात करून राजस्थानच्या गोलंदाजांचा चांगलाच समाचार घेतला. या जोडीने पहिल्या विकेटसाठी ९.३ षटकांत ११० धावांची भागीदारी केली. त्यानंतर रविंद्र जडेजाने पाथुम निस्संकाला ६२ धावांवर पायचीत केले. मग राहुलने नितीश राणाच्या साथीत संघाचा डाव पुढे नेला.

या जोडीने धावांची गती कमी होऊ दिली नाही. दिल्लीच्या १४.२ षटकांत १ बाद १७१ धावा होताच नितीश राणा यष्टीरक्षकाकडे झेलबाद झाला. मग राहूल खराब फटका मारुन जोफरा आर्चरच्या गोलंदाजीवर झेलबाद झाला. त्याने ४० चेंडूत ७५ धावा केल्या. मग ट्रिस्टन स्टब्स आणि आशुतोष शर्मा या जोडीने फटकेबाजी करून हा सामना १९.१ षटकांत जिंकला.

# दुखापतीमुळे सँटनर महिनाभर मैदानाबाहेर

■ मुंबई



खांद्याच्या दुखापतीमुळे न्यूझीलंडचा फिरकी गोलंदाज मिचेल सँटनर जवळपास महिनाभर मैदानाबाहेर राहणार आहे. मुंबई इंडियन्स संघातून खेळणारा सँटनर याआधीच आयपीएलमधून बाहेर पडल्याचे जाहीर केले होते. चेन्नई सुपर किंग्सविरुद्धच्या सामन्यात तो सीमारेषेजवळ झेल घेण्याचा प्रयत्न करताना त्याला दुखापत झाली होती. सँटनरच्या जागी खेळाडू म्हणून मुंबईने दक्षिण आफ्रिकेचा फिरकी गोलंदाज केशव महाराजला करारबद्ध केले आहे.

# कझाकिस्तानमध्ये उद्यापासून शॉटगन विश्वचषक स्पर्धा सुरू

■ अल्माटी

**कझाकिस्तानच्या** अल्माटीत दुसरी आयएसएसएफ शॉटगन विश्वचषक स्पर्धा येत्या सोमवारी सुरू होणार आहे. त्यासाठी भारताचे १३ नेमबाज अल्माटीत दाखल झाले आहेत. १० दिवसांच्या या स्पर्धेत ४२ देशांतील २८४ खेळाडू सहभागी होतील. भारतीय संघातील ८ सदस्य आरपीओ (केवळ मानांकन गुणांसाठी) नेमबाज म्हणूनही स्पर्धा करतील.

सोमवारी पुरुष आणि महिलांच्या स्किट पात्रता फेरीने स्पर्धेला सुरुवात होईल. या स्पर्धांची अंतिम फेरी ५ मे रोजी होईल. ट्रॅपच्या दोन्ही अंतिम फेऱ्या ९ मे रोजी होतील, तर ट्रॅप मिश्र सांघिक अंतिम फेरी पुढील शनिवारी १० मे रोजी होईल. विश्वचषकाचा पहिला टप्पा मार्चमध्ये मोरोक्कोमधील टँजियर येथे पार पडला होता. स्पर्धेच्या दुसऱ्या टप्प्याच्या पहिल्या दिवशी भारताचे ३ ऑलिम्पिकपटू सहभागी होतील. त्यात पुरुष स्किट स्पर्धेत मैराज अहमद खान व अनंतजीत सिंग नरुका, महिला स्किट स्पर्धेत रायझा ढिल्लन यांचा समावेश आहे.

# कॅरम स्पर्धेत अपना, ग्रेटर बॉम्बे, म्युनिसिपल बँकेची विजयी सलामी

■ मुंबई

**लाईफ** इन्शुरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया पुरस्कृत एलआयसी आनंदराव अडसूळ ट्रस्ट ट्रॉफी आंतर सहकारी बँक सांघिक कॅरम स्पर्धेत अपना बँक, म्युनिसिपल बँक, एनकेजीएसबी बँक, ग्रेटर बॉम्बे बँक संघांनी सलामीचे साखळी सामने जिंकले. साखळी अ गटात प्रियेश पाठक, गीतेश कोरगावकर, महादेव जवीर यांच्या विजयामुळे अपना बँकेने एमएससी बँकेचा ३-० असा सहज पराभव केला.



स्पर्धेचे उद्घाटन माजी केंद्रीय अर्थराज्यमंत्री आनंदराव अडसूळ, युनियनचे कार्याध्यक्ष सुनील साळवी, जनरल सेक्रेटरी नरेंद्र सावंत, खजिनदार प्रमोद पार्टे, सहखजिनदार जनार्दन मोरे, उपाध्यक्ष प्रकाश वाघमारे व प्रवीण शिंदे, शिवछत्रपती पुरस्कार विजेते लीलाधर चव्हाण आदींच्या प्रमुख उपस्थितीत झाले.दादर पश्चिम येथील सिबिईयु सभागृहात कोकण बँक विरुध्द ग्रेटर बँक यामधील साखळी ब गटाचा सामना अटीतटीत रंगला. सोहेल मुकादमने अप्रतिम फटके साधत सचिन मेस्त्रीचा २२-०, २०-० असा पराभव करून कोकण बँकेला १-० अशी आघाडी मिळवून दिली. परंतु शैलेश कर्पेने गसुद्दीन नाईकला ०-१७, १६-०, ११-१ आणि अनिल निकाळेने मुबीन शेखला १६-०, १२-९ असे नमवून ग्रेटर बॉम्बे बँकेला २-१ असा चुरशीचा विजय मिळवून दिला.

# एकनाथ शिंदे क्रिकेट क्लबचा विजय
## ओम केशकामतची अष्टपैलू कामगिरी

■ ठाणे

**ओम** केशकामतच्या अष्टपैलू कामगिरीच्या जोरावर गतविजेत्या एकनाथ शिंदे क्रिकेट क्लब (२) संघाने दैवज्ञ क्रिकेट क्लबचा ६६ धावांनी पराभव करत महाराष्ट्र माझा सेवा संस्थेने युनियन क्रिकेट क्लबच्या सहकार्याने आयोजित केलेल्या १४ व्या उपमुख्यमंत्री चषक ठाणे प्रीमियर लीग टी-२० क्रिकेट स्पर्धेत विजयी सलामी दिली. नाणेफेक हरल्यावर प्रथम फलंदाजी करताना एकनाथ शिंदे क्रिकेट क्लब (२) संघाने प्रथम फलंदाजी करताना ५ बाद २२८ धावांचे आव्हान उभे केले होते. त्याला उत्तर देताना दैवज्ञ क्रिकेट क्लबला निर्धारित षटकांमध्ये ७ फलंदाजांच्या मोबदल्यात १६२ धावापर्यंत मजल मारता आली. नाबाद ४७ धावा आणि दोन गडी बाद करणाऱ्या ओम केशकामतला सामन्यातील सर्वोत्तम खेळाडूचा पुरस्कार देण्यात आला.

सुवेद पारकर, आशय सरदेसाई, साहिल गोडे, ओम केशकामत, आरुष पाटणकरने जबाबदारीने फलंदाजी करत एकनाथ शिंदे क्रिकेट क्लब (२) संघाला सव्वा दोनशे धावा उभारुन दिल्या.

# जपानचा स्टार टेनिसपटू निशिकोरीची निवृत्ती जाहीर

■ टोकियो

**जपानचा** स्टार टेनिसपटू केई निशिकोरीने आज निवृत्तीची घोषणा केली. त्याने २०२६ हंगामाच्या अखेरीस टेनिसला अखेरचा रामराम ठोकणार आहे. निशिकोरी हा जपानच्या टेनिस इतिहासातील सर्वोच्च मानांकित खेळाडू आहे. जगातील अव्वल १० खेळाडूंमध्ये स्थान मिळवणारा तो पहिला जपानी खेळाडू होता. त्याने सर्वात अलीकडे गेल्या वर्षीच्या सिनसिनाटी ओपनमध्ये टूर-स्तरीय स्पर्धेत भाग घेतला होता. गेल्या आठवड्यात तो जॉर्जियातील सवाना येथे एका एटीपी चॅलेंजर स्पर्धेत खेळला होता. त्याने एक्सवर पोस्ट करुन सांगितले की, या हंगामाच्या अखेरीस मी व्यावसायिक टेनिसमधून निवृत्त होण्याचा निर्णय घेतला. मला लहानपणापासूनच टेनिसची आवड आहे.

# भारत पेट्रोलियम, दक्षिण मध्य रेल्वे, युवा पलटन, ओएनजीसी बाद फेरीत

■ मुंबई

**बंड्या** मारुती सेवा मंडळाने आयोजित केलेल्या अखिल भारतीय पुरुष व्यावसायिक कबड्डी स्पर्धेत भारत पेट्रोलियम, युवा पलटन, मुंबई बंदर या महाराष्ट्रातील संघासह दक्षिण मध्य रेल्वे, ओएनजीसी, जयपूर पिंक क्लब, भारतीय नौदल या इतर राज्यांतील संघांनी बाद फेरी गाठली.

बंड्या मारुती संघाने आपल्या अमृत महोत्सवी वर्ष आणि हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून या स्पर्धेचे आयोजन केले. मुंबईतील ना.म.जोशी मार्ग येथील श्रमिक जिमखाना येथे मॅटच्या एका क्रीडांगणावर झालेल्या तिसऱ्या दिवशी ब गटात मुंबईच्या भारत पेट्रोलियम संघाने दक्षिण मध्य रेल्वेला ५३-५२ असे चकवत गट विजेते म्हणून बाद फेरी गाठली, तर रेल्वेने उपविजेते म्हणून बाद फेरी गाठली. जिंकण्याच्या इराद्याने मैदानात उतरलेल्या पेट्रोलियमने आक्रमक सुरुवात करीत पूर्वार्धात २ लोण देत ३२-२१ अशी आघाडी घेतली.

उत्तरार्धात अतिसावधपणा त्यांच्या अंगाशी येणार होता. एका गुणाच्या फरकाने ते विजयी झाले. उत्तरार्धात रेल्वेने आपला खेळ उंचावत सामन्यात कमबॅक केले. त्यांना निसटता पराभव स्वीकारावा लागला.



ओएनजीसीने युवा पलटनचा ३८-३७ असा पराभव केला. तरी गुण फरकातील आकड्यामुळे या गटात युवा पलटन विजेते, तर ओएनजीसी उपविजेते म्हणून गटातून बाहेर पडले. विश्रांतीला २३-२१ आघाडी घेणाऱ्या ओएनजीसीने नंतर सावध खेळ करत हा निसटता विजय मिळविला. ओएनजीसीच्या या विजयात विजयने १२ गुण मिळवत, तर अंकित दहियाने ४ पकडी घेत महत्त्वाची भूमिका बजावली.




## आकांक्षा आणि शरण 'अडकणार'?

**अभिनेत्री** आकांक्षा रंजन कपूर आणि चित्रपट दिग्दर्शक शरण शर्मा यांच्या विवाहाच्या चर्चांनी सध्या मनोरंजन विश्वात जोर धरला आहे. दीर्घकाळापासून एकमेकांना डेट करत असलेल्या या जोडीने आता आपल्या नात्याला पुढील स्तरावर नेण्याचे ठरवले असून, या वर्षाच्या उत्तरार्धात ते विवाहबंधनात अडकण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे.

आकांक्षा रंजन कपूर ही अभिनेत्री आलिया भट्टची अत्यंत जवळची मैत्रिण म्हणून ओळखली जाते, तर शरण शर्मा याने 'गुंजन सक्सेना: द कारगिल गर्ल' सारख्या चित्रपटाचे दिग्दर्शन केले आहे. या दोघांनीही आपल्या नात्याबाबत कधीच गुप्तता पाळली नव्हती; अनेकदा ते सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये आणि सुट्ट्यांचा आनंद घेताना एकत्र दिसले आहेत.


लग्नाची तयारी आणि नियोजनाबाबत कुटुंबात प्राथमिक चर्चा सुरू झाली आहे. मात्र, आकांक्षा किंवा शरण यांपैकी कोणीही अद्याप या वृत्ताला अधिकृत दुजोरा दिलेला नाही. सोशल मीडियावर त्यांचे चाहते या जोडीच्या लग्नाच्या घोषणेची आतुरतेने वाट पाहत आहेत.



## करिश्माला दिलासा

**अभिनेत्री** करिश्मा कपूर आणि तिच्या मुलांसाठी दिल्ली उच्च न्यायालयाने एका महत्त्वाच्या वादात दिलासादायक निर्णय दिला आहे. दिवंगत उद्योगपती संजय कपूर यांच्या मालमत्तेवरून सुरू असलेल्या कायदेशीर लढाईत न्यायालयाने त्यांच्या मालमत्तेचे संरक्षण करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच, संजय कपूर यांच्या पत्नी प्रिया सचदेव यांना या मालमत्तेबाबत कोणतेही त्रयस्थ हितसंबंध निर्माण करण्यास किंवा मालमत्तेची विल्हेवाट लावण्यास तात्पुरती मतेबंदी घातली आहे.

हा संपूर्ण वाद मार्च २०२५ मधील एका कथित मृत्युपत्रावरून सुरू झाला आहे. या दस्तऐवजात संजय कपूर यांनी आपली सर्व वैयक्तिक संपत्ती प्रिया सचदेव यांच्या नावे केल्याचे म्हटले आहे. मात्र, करिश्मा कपूर आणि त्यांच्या मुलांनी हे मृत्यूपत्र बनावट असल्याचा आरोप केला आहे. न्यायालयाने या तक्रारींची दखल घेत स्पष्ट केले की, या मृत्युपत्राची वैधता तपासण्यासाठी सखोल चौकशीची गरज आहे आणि तोपर्यंत ही मालमत्ता सुरक्षित राहणे आवश्यक आहे. न्यायालयाच्या अंतरिम आदेशानुसार, प्रिया सचदेव यांना संजय कपूर यांच्या भारतातील कंपन्यांमधील शेअर्सची विक्री किंवा हस्तांतरण करण्यास मनाई करण्यात आली आहे. काही विशिष्ट बँक खात्यांमधून पैसे काढण्यावरही निर्बंध लादण्यात आले आहेत. यामध्ये परदेशातील खाती आणि क्रिप्टोकरन्सी मालमत्तेचाही समावेश आहे. मात्र, भारताबाहेरील स्थावर मालमत्तांना या आदेशातून वगळण्यात आले आहे. या प्रकरणाची सुनावणी होईपर्यंत न्यायालयाच्या या आदेशामुळे ही मालमत्ता जैसे थे स्थितीत राहणार आहे.



## फिटनेसमधील 'नानाशाही'

**वयाची** पंच्याहत्तरी ओलांडली तरी जिद्द आणि फिटनेसच्या जोरावर काय साध्य करता येते, याचे उत्तम उदाहरण ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांनी दिले आहे. सध्या सोशल मीडियावर त्यांचा एक व्हिडिओ प्रचंड व्हायरल होत असून, त्यात नाना पाटेकर तब्बल १५ 'ट्रायसेप डिप्स' मारताना दिसत आहेत. त्यांच्या या जबरदस्त फिटनेसचे कौतुक केवळ त्यांचे चाहतेच नव्हे, तर बॉलिवूडमधील फिट अभिनेत्री शिल्पा शेट्टी हिनेही केले आहे.

या व्हायरल व्हिडिओमध्ये नाना पाटेकर अत्यंत जोमाने व्यायाम करताना दिसत आहेत. ७६ व्या वर्षीही त्यांचा हा उत्साह आणि शारीरिक क्षमता पाहून तरुण पिढीलाही प्रेरणा मिळत आहे. शिल्पा शेट्टीने हा व्हिडिओ पाहून नानांचे कौतुक करताना त्यांना 'इन्स्पिरेशन' (प्रेरणास्थान) म्हटले आहे. चाहत्यांनीही या व्हिडिओवर कमेंट्सचा वर्षाव करत नाना पाटेकर यांच्या शिस्तीचे आणि आरोग्याप्रती असलेल्या जागरूकतेचे तोंडभरून कौतुक केले आहे.

नाना पाटेकर नेहमीच त्यांच्या साध्या राहणीमानासाठी आणि स्पष्टवक्तेपणासाठी ओळखले जातात. मात्र, या वयात त्यांनी दाखवलेली ही शारीरिक चपळता त्यांच्या आरोग्यासाठी घेतलेल्या मेहनतीचा पुरावाच आहे. मनोरंजन विश्वातील अनेक कलाकारांनी नानांच्या या व्हिडिओवर आपली पसंती दर्शवली असून, आरोग्यासाठी वय हा केवळ एक आकडा असतो, हे नानांनी पुन्हा एकदा सिद्ध केले आहे.



## ओरीने सोडली करणची साथ

प्रसिद्ध समाजमाध्यम व्यक्तिमत्व ओरी अर्थात ओर्हान अवत्रामणी याने आपली टॅलेंट मॅनेजमेंट एजन्सी बदलली असून मनोरंजन विश्वात ही एक मोठी घडामोड मानली जात आहे. गेल्या काही वर्षांत बॉलिवूडमधील प्रसिद्ध व्यक्तींशी असलेल्या जवळिकीमुळे व हाय-प्रोफाईल कार्यक्रमांमधील उपस्थितीमुळे चर्चेत आलेल्या ओरीने आता करण जोहरच्या 'धर्मा कॉलब आर्टिस्ट एजन्सी'ची (डी.सी.ए.ए.) साथ सोडली आहे. तो आता 'कलेक्टिव्ह आर्टिस्ट नेटवर्क' (सी.ए.एन.) या नामांकित संस्थेशी जोडला गेला आहे.

या संदर्भात अद्याप ओरी किंवा संबंधित संस्थांकडून अधिकृत घोषणा करण्यात आलेली नसली तरी, उद्योग क्षेत्रातील विश्वसनीय सूत्रांनी या बदलाला दुजोरा दिला आहे. मनोरंजन आणि इन्फ्लुएन्सर क्षेत्रात करिअरचे धोरण आणि नव्या संधींच्या शोधात असे बदल वारंवार होत असतात. ओरीच्या या नव्या वाटचालीमुळे त्याच्या आगामी प्रकल्पांबाबत आणि नव्या व्यवस्थापनांतर्गत त्याच्या पुढील रणनीतीबाबत आता उत्सुकता निर्माण झाली आहे. या बदलामागील नेमकी कारणे किंवा ओरीच्या आगामी कामाचा तपशील अद्याप गुलदस्त्यातच आहे.




## सोनालीला ट्रॅफिक तडाखा...

**मुंबईच्या** वाहतूक कोंडीचा फटका बसल्याने प्रसिद्ध अभिनेत्री सोनाली कुलकर्णी हिने समाजमाध्यमावर एक व्हिडिओ शेअर करून आपली व्यथा मांडली आहे. मुंबईहून पुण्याला जात असताना मानखुर्द पुलावर तब्बल पाच तास अडकून पडल्याचा थरारक अनुभव तिने सांगितला असून, हे अत्यंत भीतीदायक आहे, अशा शब्दांत तिने आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.

सोनालीने इन्स्टाग्रामवर शेअर केलेल्या या व्हिडिओमध्ये ती म्हणते, मी मानखुर्द पुलावर आहे आणि पाच तास झाले आम्ही इथेच अडकलो आहोत. माझ्या मागे आणि पुढे वाहनांच्या लांबच लांब रांगा आहेत. आम्ही वाहतूक नियंत्रण कक्षाशी संपर्क साधला असता, त्यांनी संयम राखण्यास सांगितले आहे. ही कोंडी नेमकी कधी सुटेल, याबाबत कोणाकडेही स्पष्टता नाही. आम्ही मागेही वळू शकत नाही आणि पुढेही जाऊ शकत नाही, अशी आमची अवस्था झाली आहे.

या व्हिडिओद्वारे तिने मदतीचे आवाहनही केले आहे. आमच्यासाठी प्रार्थना करा. पोलिसांना याबद्दल काही माहिती असेल किंवा त्यांनी दुसऱ्या बाजूने येऊन आम्हाला काही अपडेट दिले तर मोठी मदत होईल. आम्हाला भूक लागली आहे आणि काय बोलावे हे सुचत नाही. अनेक लोकांनी यापेक्षाही भयानक परिस्थितीचा सामना केला असेल, पण एकाच ठिकाणी पाच तास अडकून पडणे खरोखरच भीतीदायक आहे, असे तिने नमूद केले.



## उत्सुकता 'सुपरहिरो' सलमानची

**बॉलिवूडचा** 'भाईजान' सलमान खान आता एका आगळ्यावेगळ्या भूमिकेत प्रेक्षकांच्या भेटीला येण्यासाठी सज्ज झाला आहे. प्रसिद्ध दिग्दर्शक जोडी राज आणि डीके यांच्या आगामी सुपरहिरो चित्रपटाचे चित्रीकरण सलमान खान ऑक्टोबर २०२६ पासून सुरू करणार असल्याचे वृत्त आहे. 'द फॅमिली मॅन' आणि 'फर्जी' सारख्या सुपरहिट वेबसीरिजसाठी ओळखले जाणारे राज आणि डीके पहिल्यांदाच सलमानसोबत काम करणार असून, या बातमीने चाहत्यांमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे. प्राप्त माहितीनुसार, हा चित्रपट एका भव्य स्तरावरील सुपरहिरो ॲक्शनपट असणार आहे, ज्यात सलमान खान अभूतपूर्व अवतारात दिसण्याची शक्यता आहे. या चित्रपटाची पटकथा आणि संकल्पना राज-डीके यांच्या खास शैलीतील असेल, ज्यामध्ये ॲक्शनसोबतच मनोरंजनाचाही मोठा डोस असेल. सध्या सलमान आपल्या इतर प्रकल्पांमध्ये व्यग्र असून, हे काम पूर्ण झाल्यानंतर तो या बिग बजेट सिनेमाच्या चित्रीकरणाला सुरुवात करेल.

## 'राजा शिवाजी' नावावरील याचिका फेटाळली! रितेश देशमुखांना दिलासा



■ मुंबई

**अभिनेता** व दिग्दर्शक रितेश देशमुख यांचा 'राजा शिवाजी' हा चित्रपट आज प्रदर्शित झाला आहे. या चित्रपटाच्या नावावर आक्षेप घेत दाखल मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात आली होती. मात्र उच्च न्यायालयाने ही जनहित याचिका फेटाळली आहे. त्यामुळे रितेश देशमुख यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

मुख्य न्यायमूर्ती चंद्रशेखर यांच्या खंडपीठाने ही याचिका ग्राह्य धरली नाही. रितेश देशमुख आणि जेनेलिया देशमुख दिग्दर्शित या चित्रपटाची घोषणा २०२४ मध्ये करण्यात आली होती. निर्मिती ज्योती देशपांडे यांनी केली आहे. मात्र 'छत्रपती' हा शब्द नावातून वगळल्यामुळे श्री छत्रपती शिवाजी महाराज फाऊंडेशन या संस्थेने न्यायालयात याचिका दाखल केली होती. सुनावणीदरम्यान निर्मात्यांच्या वतीने सांगण्यात आले की, चित्रपट हा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेकापूर्वीच्या काळावर आधारित आहे. त्या काळात त्यांना 'राजा शिवाजी' म्हणूनच संबोधले जात असे. तसेच चित्रपटाच्या सुरुवातीला याबाबत स्पष्ट 'डिस्क्लेमर' देण्यात आला असून सेन्सॉर बोर्डाची मंजुरीही मिळालेली आहे. न्यायालयाने हा युक्तिवाद मान्य करत याचिकाकर्त्यांवर ताशेरे ओढले. चित्रपटाचे शीर्षक कोणत्याही प्रकारे शिवाजी महाराजांचा अवमान करणारे नाही, तसेच केवळ इंटरनेटवरील माहितीच्या आधारे याचिका दाखल करणे योग्य नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

## कल्याण-बदलापुर दोन दिवसांचा मेगाब्लॉक सुरू



■ मुंबई

**मध्य** रेल्वेने कल्याण ते बदलापूर दरम्यान तिसऱ्या व चौथ्या मार्गाचे ओएचई काम हाती घेतले आहे. त्यासाठी अप व डाऊन दक्षिण-पूर्व मार्गावर आज शुक्रवार १ मे आणि उद्या शनिवार २ मे रोजी मध्यरात्रीसाठी विशेष ट्रॅफिक व पॉवर ब्लॉक घेतला आहे. ब्लॉक कालावधीत कल्याण ते बदलापूर दरम्यानची वाहतूक पूर्णतः बंद राहील.

या ब्लॉक निर्णयामुळे आज शुक्रवारी सीएसएमटीहून रात्री ११.५१ वाजता सुटणारी सीएसएमटी बदलापूर लोकल शेवटची होती तर उद्या शनिवार २ मे रोजी रात्री ११.३० वाजता सीएसएमटीहून सुटणारी कर्जत लोकल शेवटची असणार आहे. ब्लॉकमुळे कल्याण येथे नियोजित थांबा असलेल्या लांब पल्ल्याच्या गाड्यांना प्रवाशांच्या सोयीसाठी पनवेल व ठाणे स्थानकांवर थांबा देण्यात येईल. उशिरा धावणाऱ्या मेल/एक्स्प्रेस/हॉलिडे विशेष गाड्या आवश्यकतेनुसार वळविण्यात येतील किंवा त्यांचे नियमन करण्यात येईल.

## मीरा रोडचे 'जोधपूर स्वीट' अखेर बंद मनसेचा दुकान बंद पाडल्याचा दावा

■मीरा रोड

**मागील** वर्षी मराठीच्या आंदोलनाला कारणीभूत ठरलेले मीरा रोडमधील जोधपूर स्वीटस दुकान बंद झाले आहे. हे दुकान आम्हीच बंद पाडल्याचा दावा करत मनसेने जल्लोष केला.

मागील वर्षी मीरा रोडमधील जोधपूर स्वीट या दुकानाचा मालक बाबूलाल चौधरी याने मराठी बोलणार नाही, असे उर्मट उत्तर ग्राहकांना दिले होते. त्यामुळे संतप्त मनसे कार्यकर्त्यांनी त्यांना चोप दिला होता. त्यानंतर मराठी-अमराठी वाद सुरू झाला. शहरातील अमराठी व्यापाऱ्यांनी बंद पुकारला होता आणि मनसे कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल झाले होते. त्याला उत्तर देण्यासाठी मीरा रोडमध्ये सर्व मराठी भाषिक पक्षभेद विसरून एकत्र आले होते. मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी मीरा रोडमध्ये सभा घेतली होती. शिवसेना ठाकरे गट आणि मनसे पहिल्यांदा यानिमित्ताने एकत्र आले होते.

जोधपूर स्वीट हे दुकान आता बंद झाले. आम्हीच हे दुकान बंद पाडल्याचा दावा मनसेने केला. मनसेने या दुकानातून कुणी खरेदी करू नका, असे आवाहन करत सतत दुकानाबाहेर कार्यकर्ते बसवले होते. मनसेने दुकान मालकाला धमकावून चौधरी यांचा भाडेकरार खंडीत करण्यास भाग पाडले. मराठी भाषिकांशी पंगा घेतलेल्यांना रस्त्यावर आणून दाखवले असे मनसे शहरप्रमुख संदीप राणे यांनी सांगितले.

## भोरमध्ये वयोवृद्धाने अत्याचार करून मुलीची हत्या केल्याने तणाव

■ भोर

**नसरापूर** येथे साडेतीन वर्षाच्या मुलीवर वयोवृद्धाने अत्याचार करून हत्या केली. तिचा मृतदेह शेणाच्या ढिगाऱ्याखाली ठेवला होता. आरोपी सीसीटीव्हीत कैद झाल्याने त्याला तातडीने पोलिसांनी ताब्यात घेतले. मात्र आरोपीला जागेवरच फाशीची शिक्षा देण्याचा पवित्रा घेत नसरापूर ग्रामस्थांनी मुलीचा मृतदेह शवविच्छेदनासाठी नकार देऊन ठिय्या मांडला. या घटनेमुळे संपूर्ण बाजारपेठ बंद करण्यात आली.

भीमा कांबळे (६०)असे नराधम आरोपीचे नाव असून त्याने खाऊचे आमिष दाखवून गोठ्यातील पत्रावजा खोलीत हत्या केल्याची कबुली राजगड पोलिसांना दिली. मुलगी दिसत नसल्याने नातेवाईकांनी शोधाशोध केली असता एका घरमालकाच्या सीसीटीव्हीत आरोपी मुलीसमवेत कैद झाला. मुलीच्या हत्येप्रकरणी नागरिकांनी आक्रमक होऊन महामार्गावर ठिय्या मांडला. त्यामुळे तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. वाढता तणाव लक्षात घेऊन पोलिसांनी स्वतःहून दखल घेत याप्रकरणी आरोपीविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

## रील स्टार सुरेंद्र पाटीलचा १२ वर्षांपूर्वीचा गुन्हा उघड

### अपहरण-हत्या प्रकरणात अटक

■ ठाणे

**'रील स्टार'** म्हणून ओळख असलेल्या सुरेंद्र पाटील याच्या गुन्हेगारी भूतकाळाचा धक्कादायक उलगडा झाला. काही दिवसांपूर्वी त्याच्या घरातून हत्यारे, जिवंत काडतुसे सापडली होती. २०१४ मधील अपहरण आणि हत्या प्रकरणात त्याच्यासह दोघांना अटक करण्यात आली. २०१४ मध्ये डोंबिवलीतील करण बागुल या तरुणाचे अपहरण झाले होते.

७ एकर जमिनीच्या व्यवहारातून झालेल्या वादातून त्याचे अपहरण करून दावडी येथील कार्यालयात नेण्यात आले. मात्र त्यावेळी या प्रकरणाचा छडा लागला नव्हता. अलीकडे गुन्हे शाखेला मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे तपास पुन्हा सुरू करण्यात आला. त्यानंतर पोलिसांनी संशयितांची कसून चौकशी केली असता, आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली. तपासात उघड झाले की, मुख्य आरोपी सुरेंद्र पाटील याने लोखंडी रॉडने त्याला डोक्यावर आणि चेहऱ्यावर वार करून त्याची हत्या केली. गुन्हा लपवण्यासाठी आरोपींनी मृतदेह कारमधून मुरबाड येथील बारवी धरण परिसरातील जंगलात नेऊन टाकला.

## बरगी धरणातील क्रूज दुर्घटनेतील मृतांची संख्या ९!अनेक बेपत्ता

■ जबलपूर

**मध्य** प्रदेशातील बरगी धरण येथे झालेल्या क्रूज दुर्घटनेत आतापर्यंत ९ जणांचा मृत्यू झाला असून अनेक जण बेपत्ता आहेत. या घटनेमुळे पर्यटनासाठी गेलेल्या अनेक कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार गुरुवारी सायंकाळी २९ प्रवासी आणि २ कर्मचारी यांना घेऊन जाणारी क्रूज बोट अचानक आलेल्या वादळामुळे उलटली. जोरदार वारे आणि मोठ्या लाटांमुळे बोटीचा तोल गेला. राज्याचे पर्यटन मंत्री धर्मेंद्र भावसिंह लोधी यांनी सांगितले की, सुरुवातीला ४ मृतदेह सापडले होते. त्यानंतर आणखी ५ मृतदेह मिळाल्याने मृतांचा आकडा ९ वर पोहोचला आहे. बचाव पथकांकडून अजूनही बेपत्ता नागरिकांचा शोध सुरू आहे. सध्या ८ जण बेपत्ता असून त्यात लहान मुलांचाही समावेश आहे. तमिल (५), विराज सोनी (६), मयूरम (९), पूनम थापा (७), रेशमा सय्यद (६६), आर.एच.सय्यद, समीम जफर आणि ज्योती वास (३४) यांचा शोध सुरू आहे. प्रशासनाने २४ जणांना सुरक्षित बाहेर काढले आहे. काही जण घरी परतले असून अनेक जखमींवर मेडिकल कॉलेजमध्ये उपचार सुरू आहेत.

## मुंबईत जन्म प्रमाणपत्र घोटाळा ८७ हजारांहून अधिक प्रमाणपत्रे रद्द

■ मुंबई

**मुंबईतील** बनावट जन्म प्रमाणपत्र घोटाळा प्रकरणात मुंबई महापालिका प्रशासनाने कारवाई करत तब्बल ८७,१४९ जन्म प्रमाणपत्रे रद्द केली आहेत. या प्रकरणामुळे प्रशासनात खळबळ उडाली असून आरोग्य विभागातील अधिकाऱ्यांवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले.

ही प्रमाणपत्रे जुन्या पद्धतीने आणि नियमबाह्य प्रक्रियेद्वारे जारी करण्यात आल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. या संदर्भात किरिट सोमय्या यांनी गंभीर आरोप करत आरोग्य विभागातील काही अधिकाऱ्यांनी चुकीच्या पद्धतीने जन्म प्रमाणपत्रे दिल्याचा दावा केला होता. या प्रकरणी पालिकेचे आरोग्य अधिकारी डॉ. शैलेंद्र गुजर यांना निलंबित करण्यात आले असून, आतापर्यंत सहा अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आल्याची माहिती सोमय्या यांनी दिली. बनावट प्रमाणपत्र घोटाळा उघडकीस आल्यानंतर पालिकेच्या आरोग्य विभागाने कडक पावले उचलली आहेत.

## जालनातील माजी आमदार सुरेशकुमार जेथलियांचे निधन

■ जालना

राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते आणि माजी आमदार सुरेशकुमार जेथलिया यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. पहाटे परतूर येथील त्यांच्या निवासस्थानी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाने परतूर-मंठा मतदारसंघासह जालना जिल्ह्यात शोककळा पसरली आहे. त्यांच्या निधनाची बातमी समजताच कार्यकर्ते, स्थानिक नागरिकांनी त्यांच्या निवासस्थानी गर्दी केली.

## स्वगणना करीत एकनाथ शिंदेंच्या हस्ते ठाणे जिल्हा जनगणनेचा शुभारंभ

■ ठाणे

राष्ट्रीय जनगणनेला आजपासून देशव्यापी सुरुवात झाली असून उपमुख्यमंत्री तथा ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वगणना करीत ठाण्यातील जनगणनेचा शुभारंभ केला. या जनगणनेसाठी लोकांनी सहकार्य करण्याचे आवाहन उपमुख्यमंत्र्यांनी केले.

ठाणे महापालिकेच्या मुख्यालयात झालेल्या या शुभारंभ कार्यक्रमासाठी महापौर शर्मिला पिंप्रोळकर, उपमहापौर कृष्णा पाटील, महापालिका आयुक्त सौरभ राव, जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ, अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी, जनगणना सहसंचालक रमेश भोसले आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी स्वगणनेसाठी असलेल्या क्यूआर कोडचे अनावरण शिंदे यांच्या हस्ते झाले. त्यांनी टॅबवर हा कोड स्कॅन करून स्वगणना केली. १ ते १५ मे हा स्वगणनेचा कालावधी असून त्यानंतर १६ मे ते १४ जून घरोघरी जाऊन जनगणना केली जाणार आहे.


## वसई-विरारचे रखडलेले प्रकल्प मार्गी लागणार एमएमआरडीएच्या बैठकीत सकारात्मक चर्चा

■ वसई

**वसई-विरार** शहरासाठी यापूर्वी घोषित करण्यात आलेल्या २० हजार कोटी रुपयांच्या प्रकल्पांना गती देण्याचा निर्णय झालेल्या एमएमआरडीएच्या बैठकीत घेण्यात आल्या. या प्रकल्पांमध्ये रस्ते, रिंग रुट, उड्डाणपूल, भाईंदर खाडीवरून पूल आदींचा समावेश आहे.

हितेंद्र ठाकूर, माजी आमदार क्षितिज ठाकूर आणि आमदार राजेश पाटील यांनी पाठपुरावा करून ही विकासकामे मंजूर करून घेतली होती. त्या कामांचा आढावा घेण्यासाठी गुरुवारी एमएमआरडीए अध्यक्ष संजय मुखर्जी आणि वसई-विरारचे महापौर अजीव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी विशेष बैठक आयोजित करण्यात आली होती. आमदार राजन नाईक, आयुक्त पृथ्वीराज बीपी आणि महापालिकेचे अधिकारी आदी या बैठकीला उपस्थित होते. शहरात ५ नवीन उड्डाणपूल उभारणे, ७ मुख्य रस्त्यांचे सिमेंट काँक्रिटीकरण करणे, शहरातील ४ मुख्य शहरे आणि २२ गावांना एकमेकांशी जोडणाऱ्या रिंग रूटचा रखडलेला प्रकल्प नव्याने सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. भाईंदर-नायगाव खाडीवर वाहनांसाठी व मेट्रोसाठी दुमजली पूल उभारण्याची घोषणा यापूर्वी करण्यात आली होती. त्यासाठी वनविभाग आणि मिठागर विभागाच्या परवानग्या मिळविण्यासाठी पाठपुरावा करण्यात येईल, असे एमएमआरडीएने सांगितले.

## नवाकाळ शब्दकोडे–१५९३



**आडवे शब्द –**

१. कान ३. संकट, पीडा ५. मोडतोड, भग्नता ७. अवलंबन ९. आश्रय, थारा ११. डिंक १२. शासन १३. पाठ्यपुस्तकातील गद्य उतारा, धडा १४. ढगाळ कपडा १५. अनुत्साह १६. रस्ता, वाट, मार्ग १८. अनुयायी, चेला १९. मठ्ठ २०. केरळचा नृत्यप्रकार २१. उगाच, नाहकच २२. त्रिमुखी देव २३. बुद्धी २४. नवजात बाळाचे केस २५. टिंगल, मस्करी, चेष्टा २६. स्वभाव २७. झेप २९. अधिकार ३१. आस ३२. आई ३३. प्राणीमात्रांविषयी कळवळा ३४. भारताची राजधानी ३५. मळलेले ३७. गळा ३८. स्वच्छ ३९. देणगी ४१. सदन, घराची वास्तू ४२. नेत्रांजन ४३. भीती ४५. अटळ, व्यवस्थेप्रमाणे ४६. भर उन्हाळ्यात अचानक आलेला पाऊस ४८. प्राधान्य ५०. पाच पेंढ्यांची जुडी ५१. देवापुढे जाळले जाणारे सुगंधी द्रव्य ५३. शिंपडणे, सडा घालणे ५४. नवरत्नांपैकी तांबडे रत्न ५५. नूतन ५७. रंग उडालेले, फिके पडलेले ५९. स्वच्छंदी मनुष्य ६०. झलक ६१. जिलबीच्या आकाराचा पण तिखट तळीव पदार्थ ६३. रुखरुख ६४. विष ६५. धान्य यातून निघते ६६. विषय, गोष्ट ६७. नियंत्रण ६९. उपवासाचे तांदूळ ७१. गोणपाट ७३. विषय चघळणे, काथ्याकूट करणे ७५. छळ, काच ७६. चंद्रशाला, आगाशी ७८. पूजेचे ताट ७९. पाचोळा, पाने ८२. नफादायक ८७. चिमणीचे घरटे ८९. शांतता ९१. नौका ९२. नियंत्रणाबाहेर गेलेले, सुधारण्यापलीकडचे ९६. दोस्त ९७. उसळीचे लोकप्रिय कडधान्य, हे मोड आणून वापरले जाते ९८. वीस दस्ते कागद ९९. दया, कीव

**उभे शब्द –**

१. 'सत्राणे उड्डाणे हुंकार वदनी ...' (रामदासस्वामी कृत हनुमानाची आरती) २. खोकल्याची उबळ ४. फसवणूक ५. पादचाऱ्यांसाठी रस्त्यावरील राखीव भाग ६. ओढा, निर्झर ७. भीक ८. कहाण्यांचा शेवट करणारे विधान- 'ही साठा उत्तरांची कहाणी ×× ××× ××× ×××' ९. संगीतातील तान १०. चैत्र महिन्यातला रामजन्माचा दिवस १२. विद्यावेतन १७. अतिश्रमानंतरची मरगळ २०. झाडाभोवती बांधलेला पार २२. पर्वतामधील खोरे, पोट २५. चकित, चाट २६. झाड, तरूवर २७. भीती २८. अंगठीत खडा बसवण्याची खोबण २९. सांप्रत, सध्या ३०. ढगांमुळे दाटून आलेला अंधार ३१. फिरणे ३२. गार पाण्यासाठी मातीचे भांडे ३४. रोजचा कार्यक्रम, दिनचर्या ३६. अतिकंजूष ३७. कर्णकर्कश्श बोलणे ३८. कोल्हापुरी दागिना ४०. लबाड, लुच्चा ४४. व्यस्त ४७. नवरी ४८. निरंतर, सतत ४९. विक्री ५२. इंद्राचे वज्र ५४. मानवता ५६. वचा ५८. लाकूड-कोळशाचे दुकान ६०. वस्त्राची निरी, सुरकुती, घडी ६१. लुडबूड, अनाधिकाराने केलेला हस्तक्षेप ६२. फेब्रुवारीत एकोणतीस दिवस असलेले वर्ष ६५. कारस्थान ६६. कठीण (प्रसंग) ६८. कर्तृत्ववान ६९. सूड ७०. मुस्लिमांचा सण ७२. श्रीरामाचा वंश ७४. विजय ७७. निर्मूलन ८०. लक्षावधी ८१. नियंत्रण ८३. श्रीकृष्णाची जन्मदात्री ८४. विहिरीतून पाणी शेंदण्याचे साधन ८५. हौदा ८६. भिजलेले ८८. लहान मुलांना यात निजवतात ९०. शान ९३. सोने ९४. घर ९५. मुलगी वा मुलगी •

**नवाकाळ कोडे क्रमांक १५९२ चे उत्तर**

**आडवे शब्द :** १. केळी ३. आंत्रपुच्छ ६. वागीश्वरी ९. जगदंबा ११. फुशारकी १३. कप १४. वरात १५. विषाद १६. ग्रह १७. मनधरणी १९. नवनीत २२. डाव २३. प्रत २५. सय २७. सहगमन ३०. तह ३२. तिरूपती ३४. परवा ३६. यमद्वितीया ३८. वारसदार ४१. सारे ४२. रन ४४. देखभाल ४६. जागरण ४८. चरखा ४९. कास ५०. लाल ५१. आधार ५४. पार ५६. चंगळ ५८. मावळती ६०. कवायत ६३. मुखचंद्रमा ६६. उरक ६७. सशक्त ६९. वयोमान ७०. विरस ७२. सवत ७४. आले ७६. चळवळ ७८. परावलंबी ८०. लेक ८२. उदी ८३. जात ८४. राब ८६. पीतांबर ८८. ताकदवान ९१. साहस ९२. रग ९४. डाग ९६. वकील ९८. सूर ९९. वाखाणणी १००. वाटेकरी १०१. उर १०२. सल्लागार १०३. गाणे १०४. बाब १०५. मेण

**उभे शब्द :** १. केशव २. टांग ३. आंबा ४. पुरुषार्थ ५. कुशाग्र ६. वाकी ७. श्वसन ८. पापणी ९. जतन १०. दंडनीय १२. रहस्यमय १३. करवत १७. मख्ख १८. धडा २०. वसती २१. मोह २३. प्रतिकार २४. तरू २६. करवाल २८. नमस्कार २९. प्रतीक ३१. हस्तरेखा ३३. पत्त ३५. वार ३७. मेखला ३९. समिधा ४०. रजा ४१. सारमेय ४३. नकार ४५. भालचंद्र ४७. गव्हाळ ५१. आळ ५२. रमा ५३. जोकर ५४. पाडस ५५. राख ५७. गमावलेले ५९. वर्म ६१. वाकसळ ६२. तरतरीत ६३. मुक्त ६४. चंचू ६५. सुमारे ६६. उसळ ६८. शर्करा ७१. रचयिता ७३. कोलंबस ७५. उंदीर ७७. वरद ७८. पळ ७९. वराह ८१. कपी ८२. उबगवाणे ८३. जानकी ८५. सारखा ८७. तांडा ८९. कद्रू ९०. वावर ९१. सारस ९३. गणती ९५. एकक ९७. लसूण ९९. वार १०१. उब

# मुस्लीम आरक्षणाचा अध्यादेशच कालबाह्य! सरकारचा युक्तिवाद

पान १ वरून

नोकऱ्या आणि शैक्षणिक संस्थांमध्ये पाच टक्के आरक्षण देण्याशी संबंधित मागील सर्व निर्णय आणि अध्यादेश रद्द केले. तसेच २०१४ पासूनचे पूर्वीचे निर्णय आणि परिपत्रके रद्द करून विशेष मागासवर्गीय श्रेणीतील मुस्लिमांना जात आणि नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्रे देणे बंद केले. याला आक्षेप घेत अ‍ॅड.सय्यद एजाज अब्बास नक्वी यांनी अ‍ॅड. नितीन सातपुते यांच्यामार्फत याचिका दाखल केली आहे.

या याचिकेची उच्च न्यायालयाने दखल घेत न्यायमूर्ती रियाज छागला आणि न्यायमूर्ती अद्वैत सेठना यांच्या खंडपीठाने राज्य सरकार भूमिका स्पष्ट करणारे प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश दिले होते.

### याचिकेतील मुद्दे

राज्य सरकारचा हा निर्णय संविधानाचे उल्लंघन करणारा आणि मुस्लीम समुदायाच्या हिताच्या विरोधात असल्याचा दावा याचिकेत केला आहे. मुस्लिमांना सरकारी नोकऱ्या आणि शिक्षणात दिलेले पाच टक्के आरक्षण उच्च न्यायालयाने २०१४ मध्ये कायम ठेवले होते. या निकालाला कुणाकडूनही सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आलेले नाही.

त्यानुसार सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाने प्रतिज्ञापत्र सादर करून जोरदार आक्षेप घेतला आहे. याचिकेत करण्यात आलेले आरोप हे निराधार तथ्यहीन आणि बेफिकेट असून राज्य सरकारने यावर्षी काढलेल्या शासन निर्णयामुळे (GR) मुस्लीम समाजाचे कोणतेही आरक्षण रद्द केलेले नाही, असा दावा करून याचिका सुनावणीला घेण्यायोग्य नसल्याने फेटाळण्यात यावी, अशी विनंती केली आहे. या याचिकेवर ४ मे रोजी सुनावणी होण्याची शक्यता आहे.

**सरकारची भूमिका स्पष्ट**

आरक्षण वैधानिक आधाराशिवाय चालू राहू शकत नाही. २०१४ चा अध्यादेश डिसेंबर २०१४ मध्ये कालबाह्य झाला आणि त्यानंतर त्याला पर्याय म्हणून कोणतेही कायदे करण्यात आले नाहीत. त्यामुळे त्या अध्यादेशावर आधारित कोणताही हक्क अस्तित्वात राहत नाही. तसेच, भारतीय संविधान केवळ धर्माच्या आधारावर आरक्षण देण्याची तरतूद करत नाही, असेही सरकारने स्पष्ट केले आहे.

### सरकारचा नेमका निर्णय

नव्या शासन निर्णयानुसार विशेष मागासवर्गीय श्रेणी (अ) अंतर्गत समाविष्ट असलेल्या सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास मुस्लीम गटासाठी सरकारी, निमसरकारी नोकऱ्या आणि शैक्षणिक संस्थांमध्ये पाच टक्के आरक्षण देण्याशी संबंधित मागील सर्व निर्णय आणि अध्यादेश रद्द करण्यात आले आहेत. सरकारने २०१४ पासूनचे पूर्वीचे निर्णय आणि परिपत्रके रद्द केली आहेत आणि विशेष मागासवर्गीय श्रेणीतील मुस्लिमांना जात आणि नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्रे देणे बंद केले आहे, असे नवीन आदेशात म्हटले आहे.

# टाटा सन्सकडून १,५२४ कोटी जीएसटी वसुलीची याचिका हायकोर्टाने फेटाळली

■ मुंबई

**टाटा** सन्सकडून डोकोमो या जपानी कंपनीला एका व्यवहाराच्या पुर्ततेसाठी देण्यात आलेल्या रकमेवर १ हजार ५२४ कोटी रुपये वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) वसूल करण्याची जीएसटी गुप्तवार्ता महासंचलनालयाची मागणी मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळली. टाटा सन्ससाठी हा फार मोठा दिलासा तर जीएसटी महासंचलनालयाला धक्का ठरला आहे.

टाटा सन्स आणि डोकोमो यांच्यात निर्माण झालेल्या व्यावसायिक वादात लंडनच्या लवादाने टाटा सन्सने डोकोमोला ८ हजार ४५० कोटी रुपये देण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार टाटा सन्सने डोकोमोला ती रक्कम अदा केली. त्या रकमेवरील जीएसटीसाठी जीएसटी महासंचलनालयाने २८ सप्टेंबर २०२२ रोजी नोटीस बजावली होती. त्यानंतर २६ जुलै २०२३ रोजी महासंचलनालयाने याच संदर्भात कारणे दाखवा नोटीस बजावली. टाटा सन्सने जीएसटी महासंचलनालयाच्या या नोटिसना मुंबई उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. टाटा सन्सच्या या याचिकेवर न्या.जी.एस.कुलकर्णी आणि न्या.आरती साठे यांच्या खंडपीठासमोर नुकतीच सुनावणी झाली. त्याप्रसंगी जीएसटी कायद्यातील तरतुदीनुसार टाटा सन्सने व्यावहारिक वाद सोडवण्यासाठी डोकोमोला दिलेली रक्कम ही सेवा (सर्व्हिस) मानता येणार नाही. त्यामुळे त्यावर जीएसटी आकारणे गैरलागू ठरते, असे निरिक्षण नोंदवत खंडपीठाने जीएसटी महासंचलनालयाची याचिका निकाली काढली.

# मिसिंग लिंकच्या उद्‌घाटनामुळे एक्स्प्रेसवेवर वाहतूककोंडी

पान १ वरून

यांनी या वाहतूक कोंडीत अडकलेल्या वाहनचालकांकडून कोणताही टोल न घेण्याच्या सूचना पोलिसांना दिल्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मुंबई-पुणे महामार्गावरील मिसिंग लिंक प्रकल्पाचे उद्‌घाटन झाले. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सुनेत्रा पवार हजर होते. या प्रकल्पाचे उद्‌घाटन केल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी स्वतः कार चालवत या मिसिंग लिंकवरील ड्रायव्हिंगचा आनंद घेतला. दरम्यान, उद्‌घाटनानंतर मुख्यमंत्र्यांनी या प्रकल्पाला मिसिंग लिंक नव्हे तर कनेक्टिंग लिंक म्हणण्याचे आवाहन केले. तसेच यावेळी या प्रकल्पाची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्येही झाली.

२००२ मध्ये सुरू झालेला मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग देशातील महत्त्वाच्या द्रुतगती मार्गांपैकी एक असून, खालापूर-कुसगाव 'मिसिंग लिंक' प्रकल्प २०१९ ते सात वर्षांत पूर्ण झाला. सध्या हा मार्ग हलक्या वाहनांसाठी खुला असून अवजड वाहनांना तात्पुरती बंदी आहे. या प्रकल्पामुळे घाटातील वाहतूक कोंडी व दरडींचा धोका कमी होऊन प्रवास अधिक सुरक्षित व जलद होणार आहे, तसेच अंतर सुमारे ६ किमीने घटले आहे. याच प्रकल्पांतर्गत खालापूर-खोपोली ५.७६ किमी मार्ग ८ पदरी करण्यात आला असून, खोपोली-कुसगाव भागात दोन बोगदे व दोन उंच पूल उभारले आहेत. यातील ८.९ किमी व १.५८ किमी लांबीचे बोगदे सह्याद्री पर्वतरांगांत अत्याधुनिक तंत्रज्ञानाने तयार करण्यात आले आहेत.

देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी नव्या मिसिंग लिंक पुलाच्या मजबुती आणि सुरक्षिततेबाबत महत्त्वाची माहिती दिली. तर एक्स्प्रेसवरील वाहतूक कोंडीबाबत ते म्हणाले की, मला माफी मागायची आहे. आज मुंबई पुणे एक्स्प्रेसवेवर ट्रॅफिक जाममध्ये अनेक जण अडकले, त्यांना त्रास सहन करावा लागला. सुप्रिया सुळे यांचा देखील व्हिडिओ आला. सुप्रियाताई आज तुम्ही शेवटचे ट्रॅफिकमध्ये अडकला आहे. आता तुम्ही कधीच पुण्याला जाताना ट्रॅफिकमध्ये अडकणार नाही. तुमच्या सरकारने जे काम थांबवले होते ते काम आमच्या सरकारने पूर्ण केले आहे.

# निवडणूक संपली! तीन दिवसांत गॅस दराचा भडका

पान १ वरून

८१० रुपयांवर पोहोचला आहे. हा सिलिंडर छोटे हॉटेलवाले, हातगाड्यांवर खाद्यपदार्थांचा व्यवसाय करणारे वापरतात. या दरवाढीमुळे आधीच महागाईचा सामना करणाऱ्या व्यावसायिकांवर दुहेरी आर्थिक ताण येणार आहे. गॅस सिलिंडरचा खर्च वाढल्याने हॉटेल आणि रेस्टॉरंटमधील अन्नपदार्थांच्या किमती वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांच्या खिशावर त्याचा परिणाम होऊ शकतो.

व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या दरवाढीवरून काँग्रेसचे लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सरकारवर हल्लाबोल केला. ते म्हणाले की, निवडणुकीनंतर महागाई वाढेल, असा इशारा मी आधीच दिला होता. व्यावसायिक सिलिंडरची किंमत एकाच दिवसात ९९३ रुपयांनी वाढली आहे. हे 'निवडणूक बिल' आहे. फेब्रुवारीपासून आतापर्यंत व्यावसायिक एलपीजीच्या किमती १,३८० रुपयांपर्यंत वाढल्या आहेत. अवघ्या तीन महिन्यांत जवळपास ८१ टक्क्यांनी वाढ झाली आहे. एलपीजीच्या किमती वाढल्याने याचा थेट परिणाम लहान व्यावसायिकांवर होईल. चहा विक्रेते, ढाबा, हॉटेल, बेकरी आणि मिठाई प्रत्येकावरील ओझे वाढेल. दर वाढल्यामुळे सर्वसामान्य जनतेच्या थाळीपर्यंत त्याची झळ बसेल. कारण पदार्थांच्या किमती वाढू शकतात. ही फक्त सुरुवात आहे. पहिला हल्ला गॅसवर केला आहे. आता पुढील हल्ला हा पेट्रोल-डिझेलवर होऊ शकतो.

विशेष म्हणजे, काँग्रेसचे सरचिटणीस के.सी. वेणुगोपाल यांनी काही दिवसांपूर्वी एक्सवर पोस्ट करून निवडणुका संपल्यानंतर नरेंद्र मोदी सरकार वेळ न दवडता एलपीजी सिलिंडरच्या किमतीत वाढ करेल, असे म्हटले होते.

**पूनम प्रॉपर्टी कोऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड**
नोंद. क्र. BOM/HSG/3780/ दि. २६ सप्टें., १९७२
GSTIN: 27AAAAP2735Q1Z4
बीर पूनम अपार्टमेंट्स, शिव सागर इस्टेट, डॉ. ए. बी. रोड, मुंबई ४०० ०१८.
मोबाईल: ७०२१८६३०६६
ईमेल: poonam.apartments@gmail.com
वेबसाईट: http://Poonamproperty.com

**जाहीर सूचना**

याद्वारे सूचना देण्यात येते की, पूनम प्रॉपर्टी को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि., कार्यालय - बीर पूनम अपार्टमेंट्स, शिव सागर इस्टेट, डॉ. ए. बी. रोड, वरळी, मुंबई ४०० ०१८ यांच्या मालकीची कोरी भाग प्रमाणपत्रे संस्थेच्या कार्यालयातून गहाळ झाल्याचे नोंदविण्यात आले आहे आणि ती सापडत नाहीत आणि दि. ०८ एप्रिल, २०२६ रोजी सदर संस्थेने वरळी पोलीस स्टेशन येथे संस्थेच्या कार्यालयातून कोरी भाग प्रमाणपत्रे गहाळ झाल्याबाबत तक्रार दाखल केली आहे. तक्रार आयडी: ३६६१८/२०२६ दिनांक ०८ एप्रिल, २०२६.

**गहाळ भाग प्रमाणपत्र क्र.चा तपशील**
• **भाग प्रमाणपत्र अनुक्रमांक: ३८४ आणि ३९०**

सर्वसाधारण जनता, बँका आणि वित्तीय संस्थांना याद्वारे सदर कोऱ्या भाग प्रमाणपत्रा(त्रां)सोबत कोणत्याही प्रकारे व्यवहार न करण्याबाबत खबरदार करण्यात येत आहे. कोणी व्यक्ती किंवा संस्था या गहाळ प्रमाणपत्रांच्या आधारे कोणताही व्यवहार, गहाणवट किंवा वित्तीय व्यवस्था करीत असल्यास, त्यांनी तसे त्यांच्या स्वतःच्या जोखीम आणि परिणामांवर करावे.

संस्था, त्यांची व्यवस्थापन समिती आणि तिचे सदस्य अशा कोणत्याही अनधिकृत वापर, दावे, किंवा वित्तीय दायित्वांकरिता जबाबदार धरण्यात येणार नाहीत.

कोणा व्यक्तीस सदर प्रमाणपत्र(त्रे) सापडल्यास किंवा त्यासंबंधी कोणतीही माहिती असल्यास त्यांनी ते सदर जाहीर सूचनेच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत निम्नस्वाक्षरीकार यांच्याकडे परत करावे/सूचित करावे अशी त्यांना विनंती आहे.

दिनांक: २७ एप्रिल, २०२६
ठिकाण: मुंबई, भारत
**पूनम प्रॉपर्टी सीएचएस लि.** करिता



# ड्रग माफिया डोलाला भारतात आणताच मुंबईत १,७४५ कोटींचे कोकेन जप्त

पान १ वरून

मोठ्या प्रमाणात ड्रगची तस्करी होऊन ते ड्रग मुंबईत पोहोचते. मुंबईची तरुणाई ड्रगच्या विळख्यात जात आहे. अशावेळी पोलीस आणि नार्कोटिक्स या समस्यांकडे पूर्ण दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप होत असतानाच कोकेन पकडण्याचा कारवाई आणि अमित शहा यांनी स्वतः एक्स पोस्ट करून त्याची माहिती दिल्याने या कारवाईला मिळालेले प्रोत्साहन यामुळे ड्रग रॅकेटला आळा बसेल अशी आशा निदान आता निर्माण झाली आहे. या कारवाईमुळे संघटित ड्रग सिंडिकेटला मोठा धक्का बसला आहे. या प्रकरणातून आणखी महत्त्वाचे धागेदोरे मिळण्याची शक्यता असून, पुढील काही दिवसांत काही जणांना अटक आणि धक्कादायक माहिती समोर येण्याची शक्यता आहे. या कारवाईनंतर मुंबईसह देशभरात आंतरराष्ट्रीय ड्रग सिंडिकेटविरोधातील मोहीम आणखी तीव्र होणार आहे.

**जाहीर नोटीस**
**प्रबंधक/तनिस/मु. उप./सुनावणी/२०२६**
**अपिल क्र ८३/२०२६**
**श्रीम मलिका जयराम राजभर,**
**विरुध्द**
**अपर जिल्हाधिकारी (अति/निष्का) तथा अपिलिय प्राधिकारी, पूर्व उपनगरे, आणि ईतर**

अपिलार्थी श्रीम मलिका जयराम राजभर, यांनी अपर जिल्हाधिकारी तथा अपिलिय प्राधिकारी (अति/निष्का) पूर्व उपनगरे यांच्या आदेशाविरुध्द महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा निर्मूलन व पुनर्विकास) १९७१ अधिनियम कलम ३५ अंतर्गत नियम ७ (२(अ)) अन्वये तक्रार निवारण समिती (मुंबई उपनगरे) आमचे कार्यालयात अपिल क्र ८३/२०२६ दाखल केलेले आहे.

सदर अपिलाच्या अनुषंगाने मा. तक्रार निवारण समिती (मुंबई उपनगरे) यांचे न्यायालयासमोर दिनांक १६/०४/२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली होती. सदर सुनावणी दरम्यान अपिलाधी यांनी प्रतिवादी यांना नोटीस बजावण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्याप्रमाणे अपिलार्थी यांनी प्रतिवादी क्र ३ सुवर्णा चंद्रकांत जाधव, यांचा जो पत्ता दिला आहे त्या पत्यावर नोटीस प्रतिवादी यांना बजावली होती, परंतु सदर प्रकरणी ते गैरहजर होते,

सदर अपिल प्रकरणी अपिलार्थी यांनी मा. तक्रार निवारण समिती (मुंबई उपनगरे) यांचे दालनात दाखल केलेल्या अपिलात प्रतिवादी क्र ३ सुवर्णा चंद्रकांत जाधव, यांचे म्हणणे ऐकण्यासाठी म्हणून दिनांक ०७/०५/२०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता तक्रार निवारण समिती (मुंबई उपनगरे), पहिला मजला, जुने जकात घर, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१ यांचे दालनात सुनावणी आयोजित केलेली आहे. सदर प्रकरणी **प्रतिवादी क्र ३ सुवर्णा चंद्रकांत जाधव,** यांचे यांनी आपलेकडील मूळ कागदपत्रांसह सुनावणीसाठी उपस्थित राहाणेसाठी सदरची जाहिर नोटीस देण्यात येत आहे, सदर सुनावणीस आपण उपस्थित न राहिल्यास आपणांस काहीही सांगावयाचे नाही, असे गृहित धरुन नियमानुसार पुढील निर्णय घेण्यात येईल.

**स्थळ - मुंबई शहर**
**दिनांक - २१/०४/२०२६**

सही/-
(नंदकुमार आर. साळवी)
प्रबंधक
तक्रार निवारण समिती
(मुंबई उपनगरे)

**जाहीर नोटीस**
**प्रबंधक/तनिस/मु. उप./सुनावणी/२०२६**
**किरकोळ ८५/२०२६**
**श्रीम मंगुबाई मनसुख वाघरी,**
**विरुध्द**
**अपर जिल्हाधिकारी (अति/निष्का) तथा अपिलिय प्राधिकारी, पूर्व उपनगरे, आणि ईतर**

अपिलार्थी श्रीम मंगुबाई मनसुख वाघरी, यांनी अपर जिल्हाधिकारी तथा अपिलिय प्राधिकारी (अति/निष्का) पूर्व उपनगरे यांच्या आदेशाविरुध्द महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा निर्मूलन व पुनर्विकास) १९७१ अधिनियम कलम ३५ अंतर्गत नियम ७ (२(अ)) अन्वये तक्रार निवारण समिती (मुंबई उपनगरे) आमचे कार्यालयात किरकोळ ८५/२०२६ दाखल केलेले आहे.

सदर अपिलाच्या अनुषंगाने मा. तक्रार निवारण समिती (मुंबई उपनगरे) यांचे न्यायालयासमोर दिनांक १६/०४/२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली होती. सदर सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी प्रतिवादी यांना नोटीस बजावण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्याप्रमाणे अपिलार्थी यांनी प्रतिवादी क्र ३ गौड शंभु प्रसाद, यांचा जो पत्ता दिला आहे त्या पत्यावर नोटीस प्रतिवादी यांना बजावली होती. परंतु सदर प्रकरणी ते गैरहजर होते.

सदर अपिल प्रकरणी अपिलार्थी यांनी मा. तक्रार निवारण समिती (मुंबई उपनगरे) यांचे दालनात दाखल केलेल्या अपिलात प्रतिवादी क्र ३ गौड शंभु प्रसाद, यांचे म्हणणे ऐकण्यासाठी म्हणून दिनांक ०७/०५/२०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता तक्रार निवारण समिती (मुंबई उपनगरे), पहिला मजला, जुने जकात घर, शहिद भगतसिंग मार्ग, फ़ोर्ट, मुंबई ४०० ००१ यांचे दालनात सुनावणी आयोजित केलेली आहे. सदर प्रकरणी **प्रतिवादी क्र ३ गौड शंभु प्रसाद,** यांचे यांनी आपलेकडील मूळ कागदपत्रांसह सुनावणीसाठी उपस्थित राहाणेसाठी सदरची जाहिर नोटीस देण्यात येत आहे. सदर सुनावणीस आपण उपस्थित न राहिल्यास आपणांस काहीही सांगावयाचे नाही, असे गृहित धरुन नियमानुसार पुढील निर्णय घेण्यात येईल.

**स्थळ - मुंबई शहर**
**दिनांक - १७/०४/२०२६**

सही/-
(नंदकुमार आर. साळवी)
प्रबंधक
तक्रार निवारण समिती
(मुंबई उपनगरे)

**जाहीर नोटीस**
**प्रबंधक/तनिस/मु. उप./सुनावणी/२०२६**
**अपिल क्र ८४/२०२६**
**पांडूरंग रघुनाथ बोराडे,**
**विरुध्द**
**अपर जिल्हाधिकारी (अति/निष्का) तथा अपिलिय प्राधिकारी, पूर्व उपनगरे, आणि ईतर**

अपिलार्थी पांडूरंग रघुनाथ बोराडे, यांनी अपर जिल्हाधिकारी तथा अपिलिय प्राधिकारी (अति/निष्का) पूर्व उपनगरे यांच्या आदेशाविरुध्द महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा निर्मूलन व पुनर्विकास) १९७१ अधिनियम कलम ३५ अंतर्गत नियम ७ (२ (अ)) अन्वये तक्रार निवारण समिती (मुंबई उपनगरे) आमचे कार्यालयात अपिल क्र ८४/२०२६ दाखल केलेले आहे.

सदर अपिलाच्या अनुषंगाने मा. तक्रार निवारण समिती (मुंबई उपनगरे) यांचे न्यायालयासमोर दिनांक १६/०४/२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली होती. सदर सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी प्रतिवादी यांना नोटीस बजावण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्याप्रमाणे अपिलार्थी यांनी प्रतिवादी क्र ३ रांजणे रत्नाकर धोंडू, यांचा जो पत्ता दिला आहे त्या पत्यावर नोटीस प्रतिवादी यांना बजावली होती. परंतु सदर प्रकरणी ते गैरहजर होते.

सदर अपिल प्रकरणी अपिलार्थी यांनी मा. तक्रार निवारण समिती (मुंबई उपनगरे) यांचे दालनात दाखल केलेल्या अपिलात प्रतिवादी क्र ३ रांजणे रत्नाकर धोंडू, यांचे म्हणणे ऐकण्यासाठी म्हणून दिनांक ०७/०५/२०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता तक्रार निवारण समिती (मुंबई उपनगरे), पहिला मजला, जुने जकात घर, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१ यांचे दालनात सुनावणी आयोजित केलेली आहे. सदर प्रकरणी **प्रतिवादी क्र ३ रांजणे रत्नाकर धोंडू,** यांचे यांनी आपलेकडील मूळ कागदपत्रांसह सुनावणीसाठी उपस्थित राहाणेसाठी सदरची जाहिर नोटीस देण्यात येत आहे. सदर सुनावणीस आपण उपस्थित न राहिल्यास आपणांस काहीही सांगावयाचे नाही, असे गृहित धरुन नियमानुसार पुढील निर्णय घेण्यात येईल.

**स्थळ - मुंबई शहर**
**दिनांक - २१/०४/२०२६**

सही/-
(नंदकुमार आर. साळवी)
प्रबंधक
तक्रार निवारण समिती
(मुंबई उपनगरे)

नवाकाळ
• मुंबई । शनिवार २ मे, २०२६ • पान -६

# १ लिटर इथेनॉल निर्मितीसाठी १० हजार लिटर पाणी लागते



**नवी दिल्ली** - पेट्रोलमध्ये इथेनॉल मिसळण्याच्या केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी धोरणाच्या व्यवहार्यतेवर नीती आयोगाने प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. अवघ्या एक लिटर इथेनॉलची निर्मिती करण्याच्या प्रक्रियेत तब्बल दहा हजार लिटर पाणी लागते, त्यामुळे वायू प्रदूषण कमी करण्यासाठी पेट्रोलमध्ये इथेनॉल मिसळण्याचे धोरण म्हणजे रोगापेक्षा इलाज भयंकर अशी परिस्थिती आहे, असे नीती आयोगाने म्हटले आहे. इथेनॉलची जिथे प्रामुख्याने निर्मिती होते तो भाग आधीच पाणीटंचाईचा सामना करत आहे. इथेनॉल निर्मिती वाढवल्यास येथील भूजलाचा साठा अवघ्या चार वर्षात म्हणजे २०३० पर्यंत आटून जाईल, असा इशारा नीती आयोगाने दिला आहे.

# मुकेश अंबानींकडून प्रियंका चोप्राची कंपनी खरेदी! पण 'बॉस' प्रियंकाच

■ नवी दिल्ली

**भारतीय** रिटेल क्षेत्रात मोठी घडामोड घडली असून रिलायन्स रिटेलने अभिनेत्री प्रियंका चोप्रा हिचा हेअर केअर ब्रँड 'एनोमली' विकत घेतला आहे. या करारामुळे 'एनोमली'चे सर्व ट्रेडमार्क, ब्रँड मालमत्ता आणि डिजिटल प्लॅटफॉर्मची मालकी आता पूर्णपणे रिलायन्स रिटेलकडे आली आहे. महत्त्वाचे म्हणजे, मालकी बदलली असली तरी प्रियंका चोप्रा या ब्रँडसोबत कायम राहणार आहे. ती 'क्रिएटिव्ह डायरेक्टर' म्हणून प्रॉडक्ट डेव्हलपमेंट आणि ब्रँड स्ट्रॅटेजीचे नेतृत्व करेल.



प्रियंका चोप्राने २०२१ मध्ये वेगन (शुद्ध शाकाहारी) आणि किफायतशीर ब्रँड म्हणून 'एनोमली'ची सुरुवात केली होती. उच्च दर्जा आणि सुरक्षित फॉर्म्युलेशनमुळे या ब्रँडने अल्पावधीतच जागतिक बाजारपेठेत आपली वेगळी ओळख निर्माण केली. या संदर्भात माहिती देताना रिलायन्स रिटेलच्या संचालक ईशा अंबानी म्हणाल्या की, एनोमलीला आमच्या पोर्टफोलिओमध्ये सामील करणे हा एक महत्त्वाचा धोरणात्मक निर्णय आहे. रिलायन्स आपल्या 'टीरा'सारख्या डिजिटल प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून या ब्रँडला मोठ्या स्तरावर नेईल.

# रोहित पवारांचे कर्जत महावितरण कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन

■ कर्जत

**कर्जत-** जामखेडमध्ये सुरळीत वीजपुरवठ्याच्या मागणीसाठी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांच्या वतीने कर्जत येथील महावितरण कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करण्यात आले.

वीज संदर्भातील विविध समस्यांकडे लक्ष वेधण्यासाठी हे आंदोलन करण्यात आले. नागरिकांना वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्याचा त्रास सहन करावा लागत असल्याने या प्रश्नावर तातडीने तोडगा काढावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

यावेळी रोहित पवार यांनी महावितरण अधिकाऱ्यांवर मनमानी कारभाराचा आरोप केला. ते म्हणाले की, कर्जत-जामखेड भागात सुरळीत वीजपुरवठा मिळत नाही. अधिकाऱ्यांकडून नागरिकांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष केले जात आहे.

# मुंबई महापालिकेच्या सभेला गैरहजर नगरसेवकांवर देवेंद्र फडणवीस नाराज

■ मुंबई

**मुख्यमंत्री** देवेंद्र फडणवीस यांनी मुंबई महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेला गैरहजर राहणाऱ्या नगरसेवकांवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. सभेला अनुपस्थित राहिलेल्या नगरसेवकांना नोटीस पाठवण्याची तयारी सुरू असल्याची माहिती आहे.

मुंबई महापालिकेच्या सभेत तातडीच्या प्रस्तावाला आवश्यक असलेले विशेष बहुमत न मिळाल्याने तो फेटाळण्यात आला. मंजुरीसाठी आवश्यक असलेले दोन तृतियांश किंवा तीन चतुर्थांश बहुमत न मिळाल्यामुळे सत्ताधाऱ्यांना मोठा धक्का बसला



आहे. हा प्रस्ताव दादर-नायगाव परिसरातील महत्त्वाच्या भूखंडाच्या पुनर्विकासासंदर्भात होता. यामध्ये वडाळा येथील मोक्याचा भूखंड खासगी विकासकाला, विशेषतः गोदरेज समूहाला देण्याचाही मुद्दा समाविष्ट होता. प्रस्ताव मंजूर झाला असता, तर त्या भागातील विकासाला गती मिळाली असती. मात्र, सभागृहात विरोधकांनी आक्रमक भूमिका घेत मतदानाची मागणी केली. महायुतीकडे बहुमत असतानाही प्रस्ताव मंजूर होऊ शकला नाही. सभागृहात सुमारे ४० नगरसेवक अनुपस्थित राहिल्यामुळे आवश्यक बहुमत मिळू शकले नाही. त्यामुळे प्रस्ताव फेटाळला. काँग्रेसचे गटनेते अशरफ आजमी यांनी प्रस्तावात तांत्रिक त्रुटी आणि नियमबाह्य बाबी असल्याचा आरोप केला.

# एल्फिन्स्टन पुलाजवळील रहिवाशांचा घर सोडण्यास नकार! प्रशासनाशी वाद

■ मुंबई

**मुंबईतील** एल्फिन्स्टन पुलाजवळील धोकादायक घोषित करण्यात आलेल्या इमारतीतील रहिवाशांनी घर रिकामे करण्यास नकार दिला. एमएमआरडीए अधिकारी आणि पोलीस कारवाईसाठी आल्यानंतर रहिवासी व त्यांच्यात वादावादी झाली.

प्रशासनाने इमारती धोकादायक असल्याचे सांगत रहिवाशांना पर्यायी निवासाची व्यवस्था केल्याचा दावा केला आहे. मात्र, रहिवाशांचे म्हणणे आहे की, दिलेल्या घरांमध्ये अनेक समस्या आहेत आणि सर्वांना अद्याप चाव्या मिळालेल्या नाहीत. त्यामुळे तातडीने स्थलांतर करणे अशक्य आहे.

एमएमआरडीएकडून इमारतीवर नोटिसा लावण्याचा प्रयत्न करण्यात आला, तसेच वीज आणि पाणीपुरवठा बंद करण्याचा इशाराही देण्यात आला. यामुळे संतप्त रहिवाशांनी अधिकाऱ्यांशी जोरदार वाद झाला. आम्ही सहकार्य करतो, पण आम्हाला १५ दिवसांचा कालावधी देण्याची मागणी रहिवाशांनी केली. रहिवाशांनी सांगितले की, घर रिकामे करायला आवश्यक पैशाची लगेच व्यवस्था करणे कठीण आहे. आम्ही इथे पिकनिकला राहत नाही, आमच्याही भावना आहेत.

# चिनी भागभांडवल असलेल्या विदेशी कंपन्यांसाठी गुंतवणूक नियम शिथिल

■ नवी दिल्ली

**भारत** सरकारने चिनी भागभांडवल असलेल्या विदेशी कंपन्यांसाठी थेट परकीय गुंतवणूक नियम शिथिल करण्याचा निर्णय घेतला आहे. २०२० मध्ये लागू करण्यात आलेल्या कठोर नियमांमध्ये ही महत्त्वाची सुधारणा करण्याचा उद्देश देशांतर्गत उत्पादन आणि आर्थिक विकासाला चालना देणे हा आहे. चिनी संस्थांचा किंवा गुंतवणुकदारांचा १० टक्केपर्यंत हिस्सा असलेल्या विदेशी कंपन्यांना आता भारतात गुंतवणूक करण्यासाठी सरकारी मंजुरीची आवश्यकता नाही. १० टक्क्यांपर्यंत चिनी भागभांडवल




असलेल्या कंपन्या स्वयंचलित मार्गाने गुंतवणूक करू शकतील. हे नियम इलेक्ट्रॉनिक्स, कॅपिटल गुड्स म्हणजेच भांडवली वस्तू आणि उत्पादन क्षेत्रावर केंद्रित आहेत. मात्र, गुंतवणूकदार थेट चीन, हाँगकाँग किंवा भारताशी सीमा जोडणाऱ्या देशांतील असेल, तर पूर्व-परवानगी आवश्यक राहील. भारतीय कंपन्यांना आवश्यक भांडवल उपलब्ध करून देणे आणि 'मेक इन इंडिया' उपक्रमाला गती देणे हा या धोरणामागील उद्देश आहे.

जून २०२० मध्ये कोविडच्या काळात भारतीय कंपन्यांचे अधिग्रहण रोखण्यासाठी भारत सरकारने चीनसह शेजारील देशांच्या गुंतवणुकीसाठी सरकारची पूर्वपरवानगी अनिवार्य केली होती.

# मुंबई पालिका निवडणुकीतील बस मालकांचे ५० लाख थकले

■ मुंबई

**चार** महिन्यांपूर्वी पार पडलेल्या मुंबई महापालिका निवडणुकीतील विविध कामांसाठी तैनात करण्यात आलेल्या स्कूल बस मालकांचे ५० लाख रुपयांहून अधिक प्रवास भाडे थकले आहे. पालिका अधिकारी ही थकीत रक्कम देण्यासंदर्भात मूग गिळून गप्प असल्याने बसचालक संतप्त झाले आहेत.


एसटी मंडळाच्या बस, स्कूल बस, टॅक्सी, कार आणि टेम्पो मुंबई महापालिका निवडणुकीसाठी भाड्याने घेण्यात आले होते. मात्र निवडणुका संपून ४ महिने झाले तरी स्कूल बस वाहतुकीचे पैसे अद्याप मालकांना मिळालेले नाहीत. याबाबत स्कूल बस असोसिएशनने महापालिका अधिकाऱ्यांकडे संपर्क साधला असता, त्यांच्याकडून समाधानकारक उत्तर मिळालेले नाही. निवडणुकीनंतर एक आठवड्यात पैसे मिळतील, असे आश्वासन देण्यात आले होते. परंतु स्कूल बसमालकांचे ५० लाख तर टॅक्सी, कार आणि टेम्पोच्या वाहतुकीचे ३ कोटी रुपये बाकी असल्याचा दावा स्कूल बस असोसिएशनचे अध्यक्ष अनिल गर्ग यांनी केला आहे.

# छत्रपती शिवाजी महाराजांबरोबर लग्नपत्रिकेत टिपू सुलतान प्रेरणास्थान

■ अमरावती

**अमरावती** जिल्ह्यातील वलगाव येथे एका मुस्लीम कुटुंबाने आपल्या मुलाच्या लग्नपत्रिकेत छत्रपती शिवाजी महाराजांबरोबर टिपू सुलतान यांचा प्रेरणास्थान म्हणून उल्लेख केला आहे. यामुळे संपूर्ण परिसरात या पत्रिकेची जोरदार चर्चा रंगली आहे.

विशेष म्हणजे, ही लग्नपत्रिका पूर्णपणे मराठीत छापण्यात आली आहे. यापूर्वीदेखील या कुटुंबाने मराठीतूनच पत्रिका तयार करून लक्ष वेधले होते. पत्रिकेत हिंदू आणि मुस्लीम समाजातील आदरणीय ऐतिहासिक



व्यक्तिमत्त्वांचा उल्लेख करून सामाजिक एकतेचा संदेश देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. आम्ही पत्रिकेत खरा इतिहास मांडण्याचा प्रयत्न केला आहे. सर्व महापुरुष आमच्यासाठी प्रेरणादायी आहेत. त्यांच्या विचारांतूनच समाज एकत्र येऊ शकतो. हिंदू-मुस्लीम ऐक्य पुढे नेण्यासाठी आमचा हा छोटासा प्रयत्न आहे, असे या कुटुंबाने स्पष्ट सांगितले. त्यांच्या मते, समाजात वाढत्या मतभेदांमुळे अशा सकारात्मक उपक्रमांची गरज आहे. या पत्रिकेवरून समाजमाध्यमांवर काहींनी टीका केली असली, तरी संबंधित कुटुंबाने आपली भूमिका ठामपणे मांडली आहे.

# 'आपले सरकार' पोर्टल ठप्प तांत्रिक बिघाडामुळे गोंधळ

■ मुंबई

**राज्यातील** नागरिकांना विविध शासकीय सेवा देणारे 'आपले सरकार' हे पोर्टल गेल्या चार ते पाच दिवसांपासून बंद असल्याने मोठा गोंधळ निर्माण झाला आहे. २७ एप्रिलच्या रात्रीपासून तांत्रिक बिघाड झाल्याने नागरिकांना जात प्रमाणपत्र, रहिवासी दाखला, उत्पन्न प्रमाणपत्र तसेच शिष्यवृत्ती अर्ज यांसारख्या सेवांसाठी अडचणी येत आहेत.

दररोज लाखो नागरिक या पोर्टलचा वापर करतात. सध्या स्पर्धा परीक्षा आणि शैक्षणिक प्रवेश प्रक्रिया सुरू असल्याने विद्यार्थ्यांवर याचा मोठा परिणाम झाला आहे. अनेकांचे अर्ज वेळेत पूर्ण होत नसल्याने चिंता वाढली असून सेवा केंद्रांवरही गर्दी वाढत आहे. या पार्श्वभूमीवर राज्याचे माहिती आणि तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार यांनी तातडीची बैठक घेऊन परिस्थितीचा आढावा घेतला. तांत्रिक अडचणी दूर करण्यासाठी तज्ज्ञांची विशेष समिती स्थापन करण्यात आली आहे.

# रामकुंड-त्र्यंबक येथे अमृतमंथन ध्वजस्तंभ

■ नाशिक

२०२७ **मध्ये** होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळा निमित्ताने मानाचे स्थान असलेल्या ध्वजस्तंभाच्या रचनेत यंदा मोठा बदल पाहायला मिळणार आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी यासाठी तब्बल ७ कोटी ९ लाख रुपयांच्या प्रकल्पाचा आराखडा तयार केला असून, आध्यात्मिक आणि पारंपरिकतेचा संगम साधणारे भव्य ध्वजस्तंभ उभारण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

या प्रकल्पांतर्गत रामकुंड येथे ५१ फुटी, तर कुशावर्त तीर्थ (त्र्यंबकेश्वर) येथे ३१ फुटी आणि नव्या घाटावर ५१ फुटी 'अमृतमंथन' ध्वजस्तंभ उभारले जाणार आहेत. हे ध्वजस्तंभ पारंपरिक संकल्पनेला नवा आध्यात्मिक संदर्भ देणारे

## ७ कोटींचा आराखडा

असतील. गोदावरी पंचकोटी पुरोहित संघ आणि त्र्यंबक पुरोहित संघ यांच्या संकल्पनेतून या स्तंभावर समुद्रमंथन आणि त्यातून प्राप्त १४ रत्नांची कलात्मक प्रतिकृती कोरली जाणार आहे. स्तंभाच्या तळाशी गणपती व कमळाची शुभचिन्हे असतील, तर शिखरावर भगवान विष्णूंचे वाहन गरुड विराजमान असेल. या ध्वजस्तंभांची रचना मजबुतीसाठी आतून स्टेनलेस स्टील ३१६ ग्रेड पाइपचा वापर करून केली जाणार असून बाहेरून पितळी नक्षीकाम केले जाईल. कुंभमेळ्यापूर्वीच हे काम पूर्ण करण्याचे प्रशासनाचे उद्दिष्ट आहे. रामतीर्थ गोदावरी सेवा समिती यांच्या वतीने ६ मे रोजी विशेष गोदा आरती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला रामनाथ कोविंद यांची उपस्थिती अपेक्षित असून देवेंद्र फडणवीस यांनाही निमंत्रण देण्यात आले आहे.






# मुंबईतील पूर्व उपनगरात दोन दिवस पाणीपुरवठा बंद

■ मुंबई

**मध्य** मुंबई आणि पूर्व उपनगरातील काही भागात येत्या मंगळवार ५ मे रोजी सकाळी १० ते बुधवार ६ मे रोजी दुपारी ४ वाजेपर्यंत पाणीपुरवठा बंद राहणार आहे. अमर महल ते वडाळा, परळ तसेच ट्रॉम्बे व तुर्भे उच्चस्तरीय जलाशयापर्यंतचा जलबोगदा सुरू करण्याचे काम हाती घेतले जाणार आहे. या कामामुळे या काळात लालबाग, परळ, शिवडी, वडाळा, कुर्ला, विद्याविहार, घाटकोपर, देवनार, मानखुर्द, चेंबूर आणि गोवंडी येथील नागरिकांना या पाणीटंचाईचा फटका बसणार आहे. पालिका प्रशासनाने अमर महल ते वडाळा, परळ तसेच ट्रॉम्बे व तुर्भे उच्चस्तरीय जलाशयापर्यंतचा जलबोगदा कार्यान्वित करण्याची कार्यवाही हाती घेतली आहे. याअंतर्गत १८०० मिमी व्यासाच्या जलवाहिन्यांची जोडणी व इतर पूरक कामे केली जाणार आहेत.

# अजित पवारांचे स्वप्न पूर्ण करणार बीडमध्ये सुनेत्रा पवार भावुक

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा



■ बीड

**महाराष्ट्र** दिनानिमित्त बीड येथे आज उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. पालकमंत्री म्हणून पदभार स्वीकारल्यानंतरचा हा त्यांचा बीडचा पहिलाच दौरा होता. या दौऱ्यादरम्यान सुनेत्रा पवार भावनिक झाल्या. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या आठवणींना उजाळा देताना त्यांनी बीड जिल्ह्याच्या विकासासाठी त्यांच्या स्वप्नांची पूर्तता करण्याचा निर्धार व्यक्त केला.

पहिल्यांदाच बीडमध्ये येण्याचा अनुभव सांगताना त्यांनी हा माझ्यासाठी अत्यंत भावनिक क्षण आहे, अशा शब्दांत आपल्या भावना व्यक्त केल्या. ध्वजारोहणानंतर नागरिकांना संबोधित करताना त्यांनी बीड जिल्ह्याच्या विकासाचा स्पष्ट रोडमॅप मांडला. जिल्ह्याला महाराष्ट्रातील अव्वल जिल्ह्यांच्या यादीत आणण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला. त्या म्हणाल्या की, अजित पवार यांनी हाती घेतलेले सर्व ड्रीम प्रोजेक्ट पूर्ण करण्यासाठी प्रशासनासह सर्व यंत्रणांना वेग देण्यात येईल. जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक त्या उपाययोजना राबवण्यात येतील. अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालय यांच्या विकासाला चालना देण्यात येणार आहे.

# 'गोकुळ' च्या निवडणुकीसाठी महायुती एकदिलाने लढणार

■ कोल्हापूर

**कोल्हापूर** जिल्ह्यातील राजकीय घडामोडींचे केंद्र बनलेल्या गोकुळ दूध संघाची आगामी निवडणूक महायुती एकत्र लढवणार असून निवडणूक प्रक्रिया तातडीने सुरू करण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. मुंबईत झालेल्या बैठकीत महायुती म्हणून एकदिलाने निवडणूक लढवण्यावर शिक्कामोर्तब करण्यात आले. महायुतीमध्ये गोकुळचा ताबा मिळवण्यासाठी कसून तयारी सुरू झाली आहे. हजारो दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या आयुष्यात आर्थिक सुबत्ता आणणाऱ्या गोकुळची वाटचाल अधिक जोमाने होण्यासाठी सर्वांनीच सक्रिय रहावे असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. त्याला महायुतीमधील सर्वच नेत्यांनी सहमती दर्शवली. या बैठकीला मंत्री चंद्रकांत पाटील, हसन मुश्रीफ, आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, खासदार धनंजय महाडिक, आमदार चंद्रदीप नरके, संचालिका शौमिका महाडिक, समित कदम उपस्थित होते. गोकुळची आगामी निवडणूक महायुती म्हणून एकसंघ पद्धतीने लढवली जाईल, यावर बैठकीत शिक्कामोर्तब करण्यात आले.

# 'नीट' परीक्षार्थ्यांना दिलासा! रविवारचा मेगा ब्लॉक रद्द

■ मुंबई

**'नीट- यूजी २०२६'** परीक्षेला जाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी मध्य रेल्वेने महत्त्वाचा निर्णय घेत रविवारचा मेगा ब्लॉक रद्द केला आहे. त्यामुळे परीक्षार्थींना मोठा दिलासा मिळाला आहे.

३ मे रोजी रविवारी नेहमीप्रमाणे होणारा मेगा ब्लॉक घेण्यात येणार नाही. पण देखभाल आणि अभियांत्रिकी कामांसाठी २ मेच्या मध्यरात्री काही मार्गांवर ब्लॉक घेण्यात येणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते विद्याविहार स्थानक दरम्यान मेन लाईनवरील अप आणि डाऊन धीम्या मार्गांवर रात्री १२.०५ ते पहाटे ५.०५ या वेळेत मेगा ब्लॉक राहणार आहे. या कालावधीत सीएसएमटीहून सुटणाऱ्या डाऊन धीम्या मार्गावरील काही गाड्या विद्याविहारपर्यंत जलद मार्गावर वळवण्यात येतील.

या गाड्या भायखळा, परळ, दादर, माटुंगा, शीव आणि कुर्ला स्थानकांवर थांबतील. तसेच घाटकोपरहून सुटणाऱ्या अप धीम्या मार्गावरील सेवादेखील विद्याविहार ते सीएसएमटी दरम्यान जलद मार्गावर वळवण्यात येतील. या गाड्या कुर्ला, शीव, माटुंगा, दादर, परळ आणि भायखळा येथे थांबतील.

ट्रान्स हार्बर मार्गावर ठाणे ते वाशी/नेरुळ दरम्यान रात्री ११.४५ ते पहाटे ४.४५ या वेळेत दोन्ही मार्गांवरील सेवा पूर्णपणे बंद राहतील. काही गाड्या रद्द करण्यात येणार असल्याची माहितीही रेल्वेने दिली आहे.